cmyk

## संपादकीय

### मतदार यादीतील घोळ आघाडीसाठी धोकादायकच

देशाच्या अन्य भागात मतदार यादीमध्ये जसा घोळ झाला तसाच घोळ महाराष्ट्राच्या बाबतीतही झाला आहे, एकाच घराच्या पत्त्यावर असंख्य मतदारांची नावे नोंदवली गेली आहेत. दुबार मतदार नाव नोंदणीचा प्रकारही सर्रास घडला आहे. नाव आणि पत्त्यांचाही घोळ आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१८९ | गुरूवार दि. ६ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### नाशिक कुंभमेळ्यासाठी ६६ कि.मी. चा अंतर्गत रिंगरोड

मुंबई : सन २०२७ मध्ये नाशिक–त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर नाशिक येथे ६६ किलोमीटर लांबीचा अंतर्गत रिंग रोड उभारण्यास मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. याशिवाय २४.३५ किमी लांबीचा उत्तन–विरार सागरी सेतू पुढे वाढवण बंदरापर्यंत नेण्यासाठी जोड रस्ता तयार करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत मुंबईसह नाशिक, पुण्यातील महत्वाच्या प्रकल्पांबाबत निर्णय घेण्यात आले. नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यानिमित्त रिंग रोडसह अंतर्गत रिंग रोड उभारणे आवश्यक आहे. या रिंग रोडमुळे नाशिक कुंभमेळ्यासाठी सात मार्गाने येणाऱ्या भाविकांचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या रिंग रस्त्यांची कामे मार्च–जून २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्याचबरोबर या रस्त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक भूसंपादनासही मान्यता देण्यात आली आहे.

### आईचा छळ पाहून संतप्त मुलाकडून दारुड्या पित्याची हत्या

गंगाखेड : परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील इसाद येथे मंगळवारी मध्यरात्री उशिरा आईला सतत मारहाण करणाऱ्या वडिलांचा, त्यांच्याच मुलाने पोटात चाकू खुपसून खून केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. इसाद येथील रहिवासी गणेश अंकुशराव भोसले (४०) यांना दारूचे व्यसन होते. नशेत ते दररोज पत्नीस (मुलाच्या आईला) मारहाण करत असत. वडिलांकडून आईचा सातत्याने होणारा छळ पाहून त्यांचा १६ वर्षीय मुलगा आतून संतप्त होता. दरम्यान, मंगळवारी रात्री १२ ते १२:३० वाजण्याच्या सुमारास गणेश भोसले यांनी पुन्हा पत्नीला मारहाण करण्यास सुरुवात केली. आईला रोजच होणारा हा त्रास पाहून मुलाचा संताप अनावर झाला. त्याने क्षणाचाही विलंब न लावता घरातील चाकू घेतला आणि वडिलांच्या पोटात वार केले. गंभीर जखमी झाल्याने गणेश भोसले यांचा जागीच मृत्यू झाला.

### आता दुर्गम भागापर्यंत इंटरनेट सेवा पोहोचणार – मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड (स्टारलिंक) आणि महाराष्ट्र सरकारचा माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्यात बुधवारी सामंजस्य करार करण्यात आला. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होणार असून राज्यातील दुर्गम भागापर्यंत उपग्रहाधारित इंटरनेट सेवा पोहचणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सामंजस्य करारावर स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर आणि माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह यांनी स्वाक्षरी केली. यामुळे स्टारलिंकसोबत औपचारिक भागीदारी करणारे महाराष्ट्र भारतातील पहिले राज्य ठरले आहे.

### आंबेडकरांच्या नेतृत्वात संविधान सन्मान सभा

मुंबई : २५ नोव्हेंबर २०२५ रोजी शिवाजी पार्क, दादर येथे पुन्हा एकदा वंचित बहुजन आघाडीची संविधान सन्मान महासभा भरवली जाणार आहे. २०२३ मध्ये झालेल्या महासभेच्या वेळी शिवाजी पार्क तुडुंब भरले होते. लाखो लोकांनी संविधान, लोकशाही आणि सामाजिक न्यायासाठी एकदिलाने हाक दिली होती. त्या ऐतिहासिक गर्दीच्या साक्षीने उभा राहिलेला शिवाजी पार्क यंदा पुन्हा सज्ज होत आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली होणारी ही महासभा यंदा आणखी भव्य, प्रभावी आणि ऐतिहासिक ठरण्याची शक्यता आहे. या सभेत संविधानाच्या रक्षणाचा निर्धार, मनुवादाविरोधातील भूमिका आणि लोकशाही मूल्यांचे पुनरुज्जीवन याची चर्चा केली जाणार आहे. देशभरातून लाखो कार्यकर्ते, विद्यार्थी, महिला आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मुंबईकडे रवाना होणार आहेत.

# दळभद्री सरकारकडून शेतकऱ्यांची थट्टा !

## उद्धव ठाकरे यांचा आरोप, बीड जिल्ह्यातील पाली येथे शेतकऱ्यांशी संवाद

बीड । प्रतिनिधी


**शेतकरी भोळाभबाडा आहे. इतिहासात कधी नव्हे एवढी आपत्ती मराठवाड्यात आली. हेक्टरी ५० हजार मिळाले पाहिजे, अशी आमची मागणी आहे. राज्य सरकार फक्त अभ्यास करत आहे. मी कसलीही मागणी नसताना कर्जमुक्ती केली. राज्य सरकारकडे कर्जमुक्तीसाठी संपूर्ण यंत्रणा आहे. परदेशी समिती स्वदेशी शेतकऱ्यांची वाट लावणार आहे. पॅकेज ही थट्टा आहे. हे सरकार दळभद्री आहे, आम्ही पन्नास हजार हेक्टर नुकसान भरपाई मागत आहोत. या सरकारने तुटपूंजी मदत दिली. आता मतदानापूर्वी अगोदर कर्जमाफी करा नंतर मत घ्या असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी पाली येथे झालेल्या शेतकरी संवादात सरकारला इशारा दिला.**



शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठवाड्यातील बीड येथील पाली परिसरात व संभाजीनगर मधील पूरग्रस्त भागातील दौरा केला. तसेच यावेळी उद्धव ठाकरे यांनी बाधित शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, आता कर्जमुक्ती केली तर बँकांना फायदा होईल असे म्हणतात तर जून मध्ये बँकांना फायदा होणार नाही याची माहिती द्यावी. न्याय मिळेपर्यंत शेतकऱ्यांच्या पाठीशी राहणार असल्याची ग्वाही देत दिवाळी अगोदर नुकसान भरपाई देऊ, असे म्हणाले होते. मदतीच्या नावाने आळस करत असून, जूनची मुदत मान्य नाही लगेच कर्जमुक्ती करा, अशी मागणीही करण्याचे आवाहन ठाकरे यांनी केले. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, शेतकरी हताश झाला आहे. आता त्याला मदत केली नाही तर तो संकटात जाईल अशी भीती व्यक्त करत खोटे बोलणारे सरकार असून याच्या विरोधात उभे राहणे आवश्यक आहे. शेतकरी म्हणून एकत्र आलो तरच न्याय मिळणार आहे. शेतकरी जमिनीतून कोंब फोडू शकतो तर राज्य सरकारला नक्कीच फोडणार असल्याची आशाही यावेळी त्यांनी व्यक्त केली. तसेच पुढे बोलताना उद्धव ठाकरे यांनी सांगितले की, शेतकरी संकटात असताना मुख्यमंत्री बिहार मध्ये प्रचार करत आहेत. कर्जमुक्ती झालीच पाहिजे. ५० हजार हेक्टरी मिळेपर्यंत सरकारला धारेवर धरू आणि शेतकऱ्यांसोबत राहणार असल्याचेही यावेळी ते म्हणाले. पाली येथे झालेल्या शेतकरी संवाद यात्रेमध्ये जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, उल्हास गिराम यांच्यासह शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, बाळासाहेब अंबुरे, नितीन धांडे आदी उपस्थित होते.

# बीड शिक्षण विभागात कोट्यावधीचा घोटाळा

## शिक्षणाधिकारी अन् गटशिक्षण अधिकारी यांच्या संभाषणाची ऑडिओ क्लिप व्हायरल



### दानवे विरोधीपक्ष नेते की माजी खासदार

तत्कालीन शिक्षणाधिकारी आणि केजचे बीईओ यांच्यातील संवादामध्ये दानवे यांना १५ लाख व त्यांच्या पीएला दोन लाख दिले स्पष्ट बोलले गेले आहे. मात्र हे अंबादास दानवे की रावसाहेब दानवे याचा खुलासा होणे गरजेचे आहे. घोटाळा झाकण्यासाठी लाखो रुपये नेत्यांना द्यावे लागतात हे देखील पुढे येण्याची गरज आहे. त्यासोबतच महाद्या हा शब्द येत आहे. हा महाद्या म्हणजे महादेव सोळंके जे आ.प्रकाश सोळंके यांचे पीए होते.यांचे नाव आहे का? अशीही चर्चा होत आहे.

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विभागात माध्यमिक आणि प्राथमिक कोट्यावधी रुपयाचा घोटाळा झाल्याच्या घटनेनंतर एसआयटी स्थापन करण्यात आली होती, मात्र आता यातील एक एक प्रकरण बाहेर निघत आहे. माध्यमिकचे तत्कालीन शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे आणि केजचे गटशिक्षणाधिकारी बेडस्कर यांच्यातील संवाद झालेली ऑडिओ क्लिप वायरल होत असून दानवे यांना १५ लाख तर त्यांच्या पीएनना दोन लाख रुपये दिल्याचे यात बोलले जात आहे मग हे दानवे विरोधी पक्षनेते की भाजपाचे माजी खासदार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बीड जिल्हा परिषदेमध्ये माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षण विभागामध्ये शिक्षक भरतीला मान्यता शिक्षण सेवकांची देयके शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती यासह तुकड्यांना मान्यता यामध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते सादिक इनामदार यांनी ◀◀ पान २ वर

## बच्चू कडू यांची आजपासून राज्यभर शेतकरी संवाद यात्रा

अमरावती । प्रतिनिधी

सरकारच्या कर्जमाफीच्या निर्णयानंतर शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी 'शेतकरी संवाद यात्रा' सुरू केली जात आहे. ही यात्रा गुरुवारी (दि.६) पासून पुण्यात होणार आहे. यात्रेचे नेतृत्व प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू आणि माजी मंत्री महादेव जानकर करणार आहेत.



ही संवाद यात्रा पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा तसेच राज्यातील इतर भागांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. तसेच, या यात्रेत राज्यभरातील शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी, पदाधिकारी आणि शेतकरी सहभागी होणार आहेत. राज्यात कर्जमाफीचा निर्णय जरी जाहीर झाला असला, तरी शेतकऱ्यांमध्ये अजूनही गैरसमज आणि गोंधळाचे वातावरण आहे. तसेच, अनेक बँका अजूनही शेतकऱ्यांकडून कर्जवसुलीचा तगादा लावत आहेत. ◀◀ पान २ वर

# राहुल गांधींचे मतचोरीचे आरोप केंद्रीय निवडणूक आयोगाने फेटाळले

## २२ वेळा मतदान केलेली ब्राझिलियन मॉडेल कोण? राहुल गांधींचे गंभीर आरोप





दिल्ली । वृत्तसेवा

काँग्रेसचे खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज ' फाइल्स' नावाच्या प्रेझेंटेशनद्वारे हरियाणातील निवडणुकीत झालेल्या कथित मतदार फसवणुकीचे पुरावे सादर केले. या सादरीकरणात त्यांनी दावा केला की ◀◀ पान २ वर

# डॉ.युवतीच्या आत्महत्या प्रकरणात आरोपी गोपाळ बदने पोलीस खात्यातून बडतर्फ

फलटण । प्रतिनिधी

फलटण येथे घडलेल्या डॉक्टर युवतीच्या आत्महत्येच्या प्रकरणाने संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले होते. या घटनेत आरोपी ठरलेल्या निलंबित पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याच्यावर अखेर निर्णायक कारवाई करण्यात आली आहे. सातारा पोलीस अधीक्षक कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार, बदने याला पोलिस खात्यातून बडतर्फ





करण्यात आले आहे. ही कारवाई कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी भारतीय संविधानातील अनुच्छेद ३११(२)(ब) नुसार केली आहे.

ही कारवाई केवळ आरोपीवर करण्यात आलेली प्रशासकीय कारवाई नसून, समाजात कायद्याच्या रक्षणासाठी असलेल्या पदाचा दुरुपयोग करणाऱ्यांविरुद्ध शून्य सहनशीलतेचा संदेश सरकार आणि पोलीस विभागाने दिल्याचे मानले जात आहे. फलटण शहरातील ◀◀ पान २ वर

## महाराष्ट्रात महावितरणच्या वीज बिलामध्ये १२ टक्क्यांनी कपात

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. वीज बिलामध्ये ऐतिहासिक कपात करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी महावितरणाची वीज स्वस्त झाली आहे. महावितरणच्या बिलामध्ये जवळपास १२ टक्क्यांनी कपात करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यभरातील ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महावितरणच्या वीज बिलामध्ये जवळपास १२ टक्क्यांनी कपात करण्यात आली आहे. राज्य वीज नियामक आयोगाच्या २८ मार्चच्या आदेशानुसार तूर्तास वीज बिल आकारणी करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. हायकोर्टाच्या आदेशानंतर महावितरणची वीज स्वस्त झाली आहे. महावितरणने मागच्या महिन्यात वाढवलेल्या ◀◀ पान २ वर

# खोटे सोने देवून बँकेला फसवले

## पुण्यातून भामटा व्यापारी गजाआड

बीड । प्रतिनिधी

सोन्यावर कर्ज ही स्कीम सर्व बँका आणि सर्व प्रायव्हेट फायनान्स कंपन्यांमध्ये चालू आहे. परंतु हा सोने तपासून देणाराच जर लफंगा असला तर बँक बुडालीच म्हणून समजा. बीड येथील अशाच एका सोनाराने स्वतः ग्राहक कर्ज घेण्यासाठी तयार केले. कर्जासाठी त्यांची निवेदन बँकेस पाठवली आणि त्यांना बनावट सोने तयार करून दिलं. अशा प्रकारे तयार केलेले सोने बँकेला तपासून देताना ते खरे आहे असे भासवले. बँकेने आंधळेपणाने विश्वास ठेवला आणि लोकांना भरमसाठ कर्ज वाटप केले. असे बनावट १६ ग्राहक बँक ऑफ बडोदा या बँकेमध्ये या सराफा व्यापाऱ्याने पाठवले आहेत. संशयिताचे नाव विलास उदावंत, राहणार पंडित नगर, नगर रोड, बीड,



जो 'विलास ज्वेलर्स' नावाने बीड येथे दुकान चालवायचा. जलद श्रीमंत व्हायचे म्हणून त्याने हा उद्योग चालू केला आणि सामान्य लोकांकडूनही ''सोने गहाण ठेवा, पुढच्या ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.४ नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७३.५० क्विंटल | २,००१ | २,७६१ | २,५२६ |
| ज्वारी/हायब्रिड :१५५.५० क्विंटल | २,२०० | ३,४०१ | २,८७४ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : ११.०० क्विंटल | ६,८०१ | ६,८९० | ६,८४७ |
| उडीद : १८.५० क्विंटल | ३,८५० | ५,२३६ | ४,७३० |
| बाजरी: ७६.५० क्विंटल | २,००० | २,८८५ | २,६३७ |
| मुग: १.०० क्विंटल | ४,४०० | ४,५०० | ४,४५० |
| सोयाबीन: २४१.५० क्विंटल | ४,००० | ४,५११ | ४,३६४ |
| हरभरा:६.०० क्विंटल | ४,८५० | ५,१८१ | ५,०२७ |

# लोकशाहीचे सर्व भाग नागरिकांच्या कल्याणासाठी अस्तित्वात – सरन्यायाधीश भूषण गवई

मुंबई । प्रतिनिधी

लोकशाहीच्या सर्व शाखा कार्यकारी, न्यायपालिका आणि कायदेमंडळ, नागरिकांच्या कल्याणासाठी अस्तित्वात आहेत, आणि कोणीही एकाकी काम करू शकत नाही, असे भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी बुधवारी सांगितले. मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय कायदा विद्यापीठाच्या कॅम्पसच्या प्रकल्पाच्या कार्यक्रमात सरन्यायाधीश बोलत होते.

न्या. गवई म्हणाले की, स्वातंत्र्य, न्याय आणि समानतेची तत्त्वे आपल्या संविधानात अंतर्भूत आहेत. कार्यकारी मंडळाशी सहमत नसल्यास, न्यायपालिकेला तसेच कायदेशीर शिक्षणाला पुरेशी पायाभूत सुविधा प्रदान करणे कठीण आहे. कायदा शिक्षण आता अधिक व्यावहारिक प्रशिक्षणासह विकसित होत आहे आणि म्हणूनच पायाभूत सुविधा खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. न्यायपालिकेच्या पायाभूत सुविधांच्या बाबतीत नेहमीच सक्रिय राहिल्याबद्दल गवई यांनी राज्य सरकार आणि



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. महाराष्ट्रातील न्यायव्यवस्थेला पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांपैकी एक सर्वोत्तम आहे. कायदा ही एक विकसित आणि सेंद्रिय शाखा आहे. कायदेशीर शिक्षणात आमूलाग्र बदल झाला आहे. आज आपण पुरवत असलेल्या पायाभूत सुविधा जगातील सर्वोत्तम विद्यापीठांशी तुलना करता येतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे की, वकील हा सामाजिक अभियंता देखील असतो जो सामाजिक न्यायाचे वचन प्रत्यक्षात आणतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात तीन राष्ट्रीय कायदा विद्यापीठे आहेत आणि न्या. गवई यांनी या विद्यापीठांच्या निर्मितीत खूप सहकार्य केले आहे. मला खात्री आहे की लवकरच एमएनएलयूला आंतरराष्ट्रीय विद्यापीठ म्हणून मान्यता मिळेल. नवी मुंबईतील एज्युसिटी शैक्षणिक केंद्र जगातील सर्वोत्तम दर्जाच्या १२ विद्यापीठांचे आयोजन करेल. त्यापैकी सात कॅम्पस दोन ते तीन वर्षांत सुरू होतील.

cmyk

## अग्रलेख

# सल्ला पालकांनाही लागू

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी युवापिढीला खूप मोलाचा सल्ला दिला. अडचणी आणि संकटे येतातच. त्यापासून पळून जाणे योग्य नाही. त्यांचा सामना करण्यातच हित दडले आहे. जे काम कराल ते उत्तम करण्याचा प्रयत्न करा, असे हितगूज त्यांनी केले. या मार्गदर्शनाची केवळ युवा पिढीलाच नव्हे तर त्यांच्या पालकांनाही आत्यंतिक गरज आहे. सध्याच्या युवा पिढीत एकूणच संभ्रमावस्था वाढत आहे. तंत्रज्ञानात रोज होणारे नवनवे बदल, त्याचा रोजगार क्षेत्रावर होणारा अपरिहार्य बदल, जीवघेणी स्पर्धा, दिवसेंदिवस महागडे होत चाललेले उच्च शिक्षण आणि पालकांची आर्थिक क्षमता याचा ताण मुलांवर असणे स्वाभाविकच.

डार्क वेबचा विळखा हा अजूनच वेगळ्या चिंतेचा विषय आहे. अशा संकटांचा सामना करायला, ताणतणाव आणि भावनांचे नियमन करायला मुलांना शिकवलेच जात नाही असे मानसतज्ज्ञांचे निरीक्षण आहे. त्यामुळे बहुसंख्य युवा पिढी कमालीची संभ्रमावस्थेत आढळते. जीवघेणी स्पर्धा, अपेक्षांचे ओझे, तंत्रज्ञानाच्या आविष्काराने साचेबद्ध शिक्षणापुढे उभे केलेले प्रश्न, रोजगारांची अनिश्चितता कशी हाताळावी हेच बहुसंख्य मुलांना कळत नाही आणि तसे प्रशिक्षण त्यांना देण्याच्या जाणिवेचा सार्वत्रिक पातळीवर अभाव आढळतो. मुले मशीन बनली असावीत इतके साचेबद्ध वेळापत्रक आढळते. अपयशाचा स्वीकार अनेक मुले करू शकत नाहीत. यातून पळ काढण्याची वृत्ती बळावू शकते. परिणाम वाढते मानसिक अस्वास्थ्य, हतबलता आणि नैराश्य. ते अनेकदा जीवघेण्या पद्धतीने व्यक्त होते. वाढती हिंसक वृत्ती आणि युवांच्या वाढत्या आत्महत्या हा खोलवर सामाजिक चिंतेचा विषय आहे. परिस्थितीचा सामना करण्याची सकारात्मक वृत्ती युवांमध्ये रुजवायची असेल तर पालकांची मानसिकता महत्वाची भूमिका बजावते. शिक्षण आणि करिअर याच्या पलीकडे एक आयुष्य असते याची जाणीव किती पालकांना असू शकेल? मित्र, नातेवाईक, समारंभ, वाचन, विनाउद्देश फिरणे, गप्पा मारणे, वेळ वाया घालवणे, खेळ, सणवार, भेटीगाठी यातूनही मुले सामाजिक मूल्ये शिकतात. भावनिकता, हळवेपणा, संवेनशीलता यातून रुजते. पण यात मुलांनी वेळ वाया घालवू नये असेच बहुसंख्य पालकांना वाटत असावे. शक्ती दुबे ही यूपीएससी परीक्षेत देशात पहिली आली आहे. या परीक्षेची काठिण्य पातळी वेगळी सांगायला नको. पण ती फक्त एक परीक्षा आहे, आयुष्यापेक्षा मोठी गोष्ट नाही असेच शक्ती म्हणते. त्यातील मर्म पालकांनी लक्षात घेण्याची गरज आहे. प्रत्येक मूल वेगळे असते. त्यांच्या आवडीनिवडी, क्षमता आणि कौशल्ये वेगवेगळी असतात. त्या जाणून घेण्याची खरी गरज आहे. अनेक गोष्टींच्या बाबतीत पालकच टोकाला जात असतील तर मुले तरी वेगळे काय शिकू शकतील? उदाहरणार्थ, मोबाईल. त्याचा परिचय आणि कळत-नकळत सवय लागण्यास पालकही कारणीभूत असतात. त्याचे दुष्परिणाम लक्षात येताच अनेक पालक मोबाईल काढूनच घेतात किंवा मुलांवर सारखे लक्ष ठेवतात. सगळेच पालक सुजाण नसू शकतील पण तीदेखील काही प्रमाणात शिकण्याची गोष्ट आहे हे समजून घ्यायला हवे.

मुलांना वेळच्यावेळी सगळ्या गोष्टी घेऊन देणे म्हणजे पालकत्व नव्हे. त्यापलीकडे जाऊन शिकता शिकता मुलांचे व्यक्तिमत्व फुलण्यासाठी पालकांनाच काम करावे लागेल. ती बाब फक्त शाळांवर ढकलून मोकळे होता येऊ शकेल का? मुलांचा भावनिक गरजा आधी पालकच पूर्ण करू शकतात. त्यासाठी संवादाचा पूल बांधणे आणि त्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे. त्यातून मुलांशी सहवास वाढू शकेल. मुले मोकळी होऊ शकतील. पालक आणि मुले यांच्यात विश्वासाचे बंध निर्माण होऊ शकतील. मुलांच्या मनाचा तळ पालक गाठू शकतील. त्यांच्या मनात सुरु असलेली उलथापालथ त्यातून लक्षात येऊ शकेल. परिस्थिती कशीही असली तरी पालक त्यांच्या पाठीशी आहेत असा विश्वास त्यातून मुलांच्या मनात निर्माण होऊ शकेल. चांगला माणूस घडवणे हे पालकांचे कर्तव्य आहे. मुलांचे हे लई नाही मागणे. पालक त्यांच्या मुलांना पोटचा गोळा मानतात. मुलांच्या भविष्यासाठीच कष्ट करतो असे बहुसंख्य पालक आग्रहाने सांगतात. त्या पोटच्या गोळ्यासाठी इतके तर पालक करूच शकतात. तेव्हा, गडकरी यांनी दिलेला सल्ला मोलाचा आहेच. तथापि तो पालकांनी आधी अंमलात आणायला हवा.

# चार जणांनी बौध्द मुलाला बेदम मारहाण करून जिवे मारण्याची दिली धमकी!

## एकुरका गावातील घटना ; बौध्द कुटुंब झाले भयभीत!

## मारहाण करणाऱ्या चौघांविरुद्ध केज पोलिसांत ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल!

केज । प्रतिनिधी

आमच्या मुलीला मोबाईल वरून मेसेज का केलास या आरोपावरून एकुरका गावातील एका बौध्द मुलाला गावातील चौघांनी घरातुन उचलुन रानात नेहुन जबर मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने हे बौध्द कुटुंब भयभीत झाले असुन मारहाण करणाऱ्यांवर केज पोलिसांत ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

केज तालुक्यातील एकुरका गावातील उमेश अशोक कोकाटे वय १७ वर्षे या बौध्द मुलाला गावातील चार जणांनी जबरदस्तीने उचलीत नेहुन जबर मारहाण केली आहे. तर उमेश यास त्याच्या राहात्या घरी बसलेले असताना दि.३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता सचिन अभिमान मोरे व गणेश तुळशीराम मोरे मोटारसायकलवरून घरी आले व उमेश यास म्हटले की आपल्याला पेंडीचे पोते आणायचे आहे. तु चल असे म्हटले असता उमेश याने त्यांचे सोबत जाण्यास नकार दिल्याने मोटारसायकलवरून आलेल्या सचिन अभिमान मोरे व गणेश तुळशीराम मोरे यांनी त्याला ओढुन गाडीवर बसवून नेमण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात उमेशची आई तिथे आली तुम्ही असे का करता म्हणुन त्या दोघांच्या तावडीतुन आपल्या मुलाला सोडण्याचा प्रयत्न करत असताना सचिन मोरे आणि गणेश मोरे या दोघांनी उमेशच्या आईला ढकलून दिल्याने ती खाली पडली तसेच या झटापटीत उमेची आई हिचे झंपर फाटले उमेश ची आई खाली पडल्याचे पाहून सचिन मोरे व गणेश मोरे या दोघांनी उमेश यास सांगितले की तुझे पप्पा आमच्या शेतात आहेत.तिथे एक काम आहे.तु आमच्या सोबत चल असे म्हणून त्याला मोटारसायकल वर टाकून शेतात नेहले. सदरील मोटारसायकल सचिन मोरे चालवत होता.तर गणेश मोरे मागे बसुन उमेश यास दोघांच्या मध्ये घेऊन शेतात नेहले. गाडी थांबताच गाडीवरून खाली उतरत असताना सचिनने पाठिमागुन ढकलल्यामुळे उमेश हा जमिनीवर पडला.त्या दोघांनी उमेश यांस सचिन मोरे यांचे वडील अभिमान मोरे व तुळशीराम मोरे यांच्या समोर नेहले असता अभिमान मोरे यांनी उमेश यास म्हटले की तू आमच्या पोरीला मेसेज का केलास असे म्हणून उमेश यास मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यास माफी मागायला लावुन त्याचा त्यांच्या मोबाईल मध्ये व्हिडिओ शूटिंग करून घेतली. व परत मारहाण करण्यात आली.यावेळी अभिमान मोरे याने धेडग्या,माहरड्या तुझी लायकी आहे का आमच्याशी बोलण्याची अशी जातीयवाचक शिवीगाळ केली. व तु असे पुन्हा केलेल्यास तुला ठार मारुत अशी धमकी दिली. त्यानंतर तुळसीराम मोरे सचिन यांच्या हातातील लोखंडी रॉड घेऊन उमेश याच्या पाठित जबर मारहाण केली.त्यामुळे उमेश खाली जमीनीवर पडला त्यानंतरही न थांबता तुळशीराम मोरे याने उमेश याच्या पोटात लाथा बुक्या आणि चपलाने जबर मारहाण केली. वरील सर्वांनी मिळून उमेश यास लाथा बुक्याने आणि लोखंडी रॉडने जबर मारहाण केल्याने उमेश हा काही काळ बेशुद्ध पडला. यावेळी उमेश यास काही कळत नव्हते. काही वेळानंतर उमेश यांचे वडील अशोक ऊध्दव कोकाटे यांना फोन करून घटनेची माहिती दिली. उमेश यास सचिन अभिमान मोरे, गणेश तुळशीराम मोरे, अभिमान मच्छिंद्र मोरे व तुळशीराम केशव मोरे या चौघांनी उमेश अशोक कोकाटे यास लोखंडी रॉड,चापटाबुक्या, बुटासह चपलाने जबर मारहाण करून जातीवाचक शीवीगाळ करत उमेश यास जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी केज पोलिसांत उमेश अशोक कोकाटे यांस जबर मारहाण करणाऱ्या सचिन अभिमान मोरे, गणेश तुळशीराम मोरे, अभिमान मच्छिंद्र मोरे व तुळशीराम केशव मोरे यांचे विरुद्ध केज पोलिसांत ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार भा.न्या.सं.(बी एन एस ) २०२३ कलम ११५ (२), ११८(१), ३५२, ३५१(१) व अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम,१९८९ ३(२)(), ३(१)() व ३(२)() नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलिस अधीक्षक यांचे मार्गदर्शन खाली केज पोलिस करत आहेत. मात्र या घटनेमुळे एकुरका गावातील कोकाटे कुटुंब भयभीत झाले असुन त्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे.

# वडवणी पोलीसांनी उलगडले तळ्यात बांधुन मिळालेल्या महीलेच्या मृत्युचे गुढा

वडवणी । प्रतिनिधी



दि २४/१०/२०२५ रोजी बालासाहेब यादव रा. खंडोबाची वाडी यांनी पोलीस ठाणे वडवणी येथे त्यांची सासु आशाबाई करांडे रा. पिंपळनेर वय-५७ वर्ष, या दि. २४/१०/२५ रोजी त्यांचे शेतातुन घरी परतत असताना सायकांळी ७ वाजेच्या सुमारास हरवल्या व घरी आल्याच नाही अशी मिसींग तक्रार दिली होती. या महीलेचा शोध सुरू असताना दि. २६/१०/२०२५ रोजी सायंकाळी पाच वाजे सुमारास सदर महीलेचचे प्रेत डोंगर वाडी (खडकी शिवारातील पाझर तलावात एक दगड बांधलेल्या अवस्थेत तरंगताना दिसले. पोलीसांनी सदर प्रेत अंबाजोगाई येथे शवविच्छेदन करून नातेवाईकांचे ताब्यात दिले, सदर प्रकरणात आत्महत्या, हत्या की अपघात असा कोणताच अंदाज लावणे शक्य नव्हते. त्यामुळे त्या महीलेचा मृत्यू नेमका कसा झाला? कुणी घडवुन आणला? हे उघडकीस आणणे वडवणी पोलीसांपुढे मोठे आव्हान होते.

दरम्यान उप-विभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायकवाड अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी घटनास्थळी भेट देवून तपासाबाबत मार्गदर्शन केले व त्यांचे मार्गदर्शना खाली वडवणी पोलीस तपास करत असताना सदर तनावाचे विरुद्ध दिशेस असलेल्या खंडोबाची वाडी शिवारात काही शेतकऱ्यांनी जंगली जनावरांपासुन पिकांचे संरक्षण व्हावे, यासाठी इलेक्ट्रीक तारेचे कुंपण रात्रीच्या वेळी घातलेले असल्याचे निदर्शनास आले. संपूर्ण परिसराची पाहणी केली असता पोलीसांना ते तार दिसुन आले. त्यावरून तिन्ना इलेक्ट्रीक करंट लागुन तिचा मृत्यु होवू शकतो या निष्कर्षाप्रत पोलीस पोहचले. संशयित व्यक्ती हनुमंत महादेव कांबीलकर व गणेश महादेव कांबीलकर यांना ताब्यात घेऊन विश्वासात घेवून विचारपुस केली असता दोन्ही आरोपींनी सदर महीला ही त्यांचे शेतात करंट लागुन पडलेली होती. सदर अनोळखी महीलेबाबत कुणालाही काही कळू नये, म्हणून पुरावा नष्ट करण्यासाठी सदर महीलेचे प्रेत दोन्ही आरोपीनी डोंगराची वाडी शिवारातील पाझर तलावात दगड बांधुन टाकले अशी कबुली दिली. सदर प्रकरणात मयत महीलेचे मुलाचे तक्रारी-वरून गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सपोनि वर्षा व्हगाडे करत असुन आरोपीना १० नोव्हे २०२५ पर्यंत पोलीस मा. न्यायालयाने कोठडी सुनावली आहे. ही कार्यवाही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, शैलेश गायकवाड यांचे मार्गदर्शना-खाली वडवणी पोलीस ठाण्याच्या वर्षा व्हगाडे, राजु राठोड, आदिनाथ तांदळे, पोह विलास खरात, पो. अंमलदार नवनाथ लटपटे, राम शिणगारे यांनी केली. पोलीस अधीक्षक बीड, करीता

## पान ६ वरून...

### शिरूर तालुक्यात केंद्रीय

शास्त्रज्ञ डॉ. एस व्ही शर्मा व त्यांचे सहकारी यांच्यासोबत बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विठ्ठल साळवे, बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव, पाटोद्याच्या उपविभागीय वसीमा शेख, शिरूर कासारचे तहसीलदार सुरेश घोळवे, गटविकास अधिकारी बागलाने, तालुका कृषीअधिकारी नागरगोजे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता गौरव मोरे, विद्युत वितरणचे सानप, मंडळ अधिकारी शहादेव सानप तलाठी शारदा राठोड यांच्यासह इतर सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### अनिल जगताप यांची

या निवेदनावर प्रतिसाद देताना उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी, कपिलधारवाडीतील लोकांची समस्या सोडवण्यासाठी शासन पातळीवर तातडीने ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासन दिले. या प्रसंगी शिवसेना संपर्क नेते अर्जुनजी खोतकर साहेब आणि शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब उपस्थित होते.

### भाजपचे बंडखोर माजी

आहे.आष्टी विधानसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतरसुद्धा त्यांची लोकप्रियता कायम राहिली.आष्टी,पाटोदा, शिरूर का. विधानसभा मतदार संघातील कार्यकर्त्यांच्या चर्चेतून आणि आग्रहावरून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करावा अशी इच्छा सर्वाकडुन व्यक्ती केली जात होती.या सर्वांचा आदर करत माजी आ.भीमराव धोंडे यांनी येत्या ११ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई येथील राष्ट्रवादी भावनांमध्ये प्रमुख ५०० कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये आणि मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती माजी आ.भीमराव धोंडे यांच्या संपर्क कार्यालयातुन मिळली आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार हे सत्ता पक्षातील अत्यंत आक्रमक धडाडीचे नेते म्हणून ओळखले जातात.त्यांच्या पक्षातून त्यांच्या माध्यमातून विकास करण्यासाठी शक्ती आणि बळ मिळेल आणि सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर आणि सर्व घटकांना अपेक्षित न्याय मिळेल अशी अपेक्षाही या निमित्ताने माजी आ. धोंडे यांनी व्यक्त केले आहे.यानंतर मात्र मतदार संघातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलणार असून भीमराव धोंडे यांना मोठे यश प्राप्त होईल असा राजकीय अंदाज आहे.माजी आ. भीमराव धोंडे हे भाजपमधून निलंबन केल्यानंतरसुद्धा त्यांनी भाजपात पुनर्प्रवेशासाठी प्रयत्न केला परंतु विधानसभा अपक्ष लढवल्याने भाजपचे आ.सुरेश धस यांनी लेखी पत्र देऊन भाजपामध्ये प्रवेश देऊ नये असे म्हटले.ना.पंकजाताई मुंडे यांच्याकडून सुद्धा वरिष्ठ स्तरावरून भीमराव धोंडे यांच्या भाजप पक्ष प्रवेशासाठी प्रयत्न झाला नाही म्हणून अखेर सत्ताधारी पक्षातच प्रवेश घेण्याचा निर्णय माजी आ. भीमराव धोंडे यांनी घेतला आणि त्याला ११ नोव्हेंबरचा मुहूर्तही मिळाला आहे.

राजकीय समीकरणे बदलणार!

माजी आ.भीमराव धोंडे यांचा आष्टी, पाटोदा,शिरूर का. विधानसभा मतदार संघात मोठा मतदार आहे एक संयमी,शांत,शिस्तप्रिय आणि विकासाभिमुख नेतृत्व अशी त्यांची ओळख आहे. सत्ताधारी पक्षातील उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील प्रवेशाने येत्या काळात होणाऱ्या विविध निवडणुकां मधून याचा प्रत्यय येईल.यानिमित्ताने राजकीय समीकरणे मात्र नक्की बदलणार हे मात्र निश्चित!

### एआयएमआयएमच्या नेतृत्वाने

त्या वेळी एआयएमआयएमने पाच आमदार निवडून आणले, ज्यात ईमान यांचा समावेश होता. भाऊंनी दिलेल्या जबाबदाऱ्यांनुसार, यावेळीही ते बिहारसोबतच तेलंगणा, गुजरात आणि दिल्लीतील पक्षाच्या प्रचार मोहिमांमध्येही सक्रिय असतील. ''सीमांचलच्या मुस्लिम समाजाच्या हक्कांसाठी आणि विकासासाठी एआयएमआयएमची लढाई कायम आहे. महाराष्ट्रातून आम्ही पूर्ण ताकदीने साथ देत आहोत,'' असे भाऊ म्हणाले.प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर यांनी सांगितले, ''राष्ट्रीय अध्यक्षांच्या दृष्टिकोनानुसार, आम्ही स्थानिक मुद्द्यांवर जसे पूरप्रवण भाग, शिक्षण आणि आरोग्य लक्ष केंद्रित करत आहोत. इम्तियाज जलील साहेबांच्या नेतृत्वात महाराष्ट्र एकजुटीने बिहारच्या या लढ्यात सहभागी आहे. तर फेरोज लाला यांनी मराठवाडा विभागातून २०१९ पासून पक्षाच्या विस्तारात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, ते आता बिहारमधील प्रचारातही प्रमुख भूमिका बजावणार आहेत.

### दादा म्हणजेच आमचा पक्ष

समाजाच्या वतीने करण्यात येत आहे. गेल्या अनेक वर्षापासून माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार, तथा माजी मंत्री प्रकाश दादा सोळंके यांनी माजलगाव मतदार संघासाठी अनेक विकास कामे केली. सर्व जाती धर्मांना बरोबर घेऊन चालणारे नेते म्हणून प्रकाश दादा सोळंके यांची ख्याती आहे.खरंतर उपळी जिल्हा परिषद गट ओबीसी राखीव साठी सुटल्यामुळे बंजारा बांधवांना असं वाटत आहे की, या उपळी सर्कल मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ व एकनिष्ठ कार्यकर्ते कुप्पा ग्रामपंचायतचे माजी सरपंच उत्तमराव दामू पवार यांना या भागा मधून निवडणूक लढविण्याची संधी आ. प्रकाश सोळंके व युवा नेते जयसिंग सोळुंके यांनी द्यावी अशी मागणी या परिसरातील सर्व जाती धर्मातील नागरिकांनी व बंजारा समाजाच्या नागरिकांनी केली आहे.

### नगरपरिषदांच्या निवडणुकी

खर्चाचे लेखाजोखा वेळेत सादर करणे बंधनकारक आहे .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शेवटी सांगितले की , '' निवडणूक आयोगाने घालून दिलेले सर्व नियम पाळूनच लोकशाहीचा हा उत्सव साजरा करावा . प्रशासन तयार आहे , आता नागरिकांनी आणि उमेदवारांनीही जबाबदारीने सहभाग नोंदवावा.या सर्व पार्श्वभूमीवर बीड जिल्हा प्रशासनाकडून निवडणुका शांततामय , पारदर्शक आणि अनुशासित वातावरणात पार पडाव्यात यासाठी सर्व स्तरावर तयारी पूर्ण करण्यात आली आहे .

### उत्तम हजारे यांना

उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत, डीएसपी न्यूज लाईव्ह मिडीया, जि. सातारा यांनी मंगळवारी पुरस्काराची घोषणा केली. बीडसह महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. रविवार दि.९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. होणाऱ्या कार्यक्रमास खा. उदयनराजे भोसले, मंत्री जयकुमार गोरे, मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह आमदार अतुल भोसले, पोलिस अधिक्षक तुषार दोशी, डिजीटल मिडीया संपादक संघाचे अध्यक्ष राजा माने, सदाशिव खाडे, रेणुताई येळगावकर, मनोज घोरपडे, माजी आमदार दिलीपराव येळगावकर, डॉ. सुनील फरांदे, सुनील काटकर, धैर्यशील कदम, घनशाम सोनवणे, श्रीकांत देवकर, रणजित सावंत, नंदकुमार मोरे, अनिल माळी, अंकुशराव गोरे, सोमनाथ भोसले, उज्वला गाडेकर, अनिल देसाई , विनोद खाडे, गायिका गायत्री साळवे, हभप शिवानीताई शिंदे, वैभवी कांबळे, राहूल कोळी, काजल ढोणे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सातारा जिल्ह्यातील वडूज येथील सौभाग्य मंगल कार्यालयाच्या सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा होणार असून, या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक दत्तात्रय सयाजी फाळके, डीएसपी न्यूज व पत्रकार संघाने केले आहे.

## पान १ वरून...

### डॉ.युवतीच्या आत्महत्या

एका डॉक्टर युवतीने २३ ऑक्टोबर रोजी आपले आयुष्य संपवले होते. ही घटना स्थानिक हॉटेलमध्ये घडली होती. आत्महत्येपूर्वी तिने तळहातावर लिहून निलंबित पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याच्याकडून चार वेळा अत्याचार झाल्याचा आणि इंजिनिअर प्रशांत बनकर याच्याकडून सतत मानसिक छळ केल्याचा आरोप केला होता. या नोंदीमुळे दोन आरोपींविरुद्ध गंभीर स्वरूपाची चौकशी सुरू झाली. घटनेनंतर फलटण पोलिसांनी तत्काळ हालचाल करत दोघांनाही ताब्यात घेतले होते. न्यायालयाने या दोन्ही आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली असून, त्यांना जिल्हा कारागृहात हलविण्यात आले आहे. चौकशीदरम्यान गोपाळ बदने याने सेवेत असताना अधिकारांचा गैरवापर केल्याचे, नैतिकता आणि शिस्तीच्या विरुद्ध वर्तन केल्याचे, तसेच समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण करणारी वर्तणूक केल्याचे समोर आले. यामुळे शासकीय सेवेतील आचारसंहिता मोडली गेल्याचे नमूद करण्यात आले. विशेष पोलीस महानिरीक्षकांनी नोंदवलेल्या आदेशात, ''पोलिस पद हे नागरिकांच्या सुरक्षेसाठी, कायदा-सुव्यवस्थेच्या रक्षणासाठी असते. या पदाचा वापर वैयक्तिक स्वार्थ आणि दडपशाहीसाठी करण्यात येणे अस्वीकार्य आहे,'' असे स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणात तपास यंत्रणेला आरोपींच्या मोबाइल फोनमधून काही महत्त्वपूर्ण पुरावे मिळाल्याची माहिती समोर आली आहे. या पुराव्यांवर आधारित तपास आणखी वेगाने पुढे नेण्यात येत आहे. तपासाची सूत्रे आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांच्या देखरेखीखाली आहेत. तपास यंत्रणेचे लक्ष आता या घटनेशी संबंधित पुरावे, संभाव्य पूर्वीच्या धमक्या किंवा दबावाचे संदेश, आणि दोन्ही आरोपींचे संभाव्य आर्थिक किंवा इतर संबंध यांचा तपास करण्याकडे आहे.

### बच्चू कडू यांची आजपासून

त्यामुळे शेतकऱ्यांना खरी माहिती पोहोचवण्यासाठी आणि त्यांच्या शंका दूर करण्यासाठी राज्यभर 'शेतकरी संवाद यात्रा' आयोजित करण्यात आली आहे. तसेच, राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी ३० जून २०२६ पर्यंत कर्ज आणि हप्त्यांपासून सूट दिली आहे. तसेच सर्व राष्ट्रीयकृत, जिल्हा मध्यवर्ती आणि सहकारी बँकांना चालू हंगामात शेतकऱ्यांना पीककर्ज देण्याचे आदेश दिले आहेत. कोणत्याही बँकेने किंवा पतसंस्थेने शेतकऱ्यांवर दबाव आणू नये, याची जबाबदारी संबंधित बँक व्यवस्थापकांनी घ्यावी, असेही पवार यांनी सांगितले.

### बीड शिक्षण विभागात

शिक्षण उपसंचालक यांच्याकडे दिली होती. शिक्षण उपसंचालकाने याची दखल घेत यावर एसआयटी स्थापन केली आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत दोन्हीही शिक्षण अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येऊ नयेत असे निर्देश दिले होते. तरी देखील माध्यमिक शिक्षण अधिकारी नागनाथ शिंदे यांची बदली करण्यात आली. प्रामुख्याने गेल्या चार दिवसापासून एक ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, त्यामध्ये तत्कालीन माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे आणि केज पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी बेडस्कर यांच्यामध्ये झालेला संवाद अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. ते बोलताना वरिष्ठ संचालकाने चुकीचा शेरा दिला असल्यामुळे महाद्या असे नाव घेत तो परेशान असल्याचे बोलले गेले. याबरोबरच दानवे यांना १५ लाख रुपये दिले गेले. त्यानंतर पुन्हा एकदा त्यांचे पीए यांना दोन लाख रुपये आगावू दिले असल्याचे यामध्ये नमूद आहे. विशेषतः हे दानवे कोण आहेत याविषयी जोरदार चर्चा सुरू आहे. प्रामुख्याने नागनाथ शिंदे वादग्रस्त ठरले आहेत. या ऑडिओ क्लिपमुळे शिक्षण विभागातील कारभारावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### राहुल गांधींचे मतचोरीचे

हरियाणात एका ब्राझिलियन मॉडेलच्या फोटोचा वापर करून एका युवतीने २२ वेळा मतदान केले.

राहुल गांधींनी ज्या फोटोचा दाखला देत ''ब्राझिलियन मॉडेल'' म्हटले, ती व्यक्ती प्रत्यक्षात मॉडेल नसून एका फोटोग्राफरच्या कामाचा भाग आहे. त्या फोटोचा मालक मॅथ्यूज फेरेरो

नावाचा ब्राझिलचा एक फोटोग्राफर आहे. त्यानेच हा फोटो काढला आहे, आणि तो फोटो फ्री वेबसाइट्सवर अपलोड करण्यात आला आहे. म्हणजेच हा फोटो सार्वजनिक वापरासाठी खुला आहे, कोणतीही व्यक्ती हा फोटो वापरू शकते. हा फोटो सध्या अनेक ई-कॉमर्स साइट्स, यूट्यूब थंबनेल्स आणि जाहिरातींमध्ये वापरला जात आहे. म्हणूनच, तो ''ब्राझिलियन मॉडेल''चा असल्याचा दावा चुकीचा आहे. फोटोमध्ये दिसणारी महिला खरी असली, तरी तिचे नाव खरे नाही, कारण हे नाव त्या फोटो काढणाऱ्या फोटोग्राफरचे आहे. काँग्रेसच्या अधिकृत अकाउंटवरून एका पोस्टमध्ये लिहिले होते. ''ब्राझिलची नागरिक मैथ्यूज फेरोरो हिने हरियाणात स्वीटी, सरस्वती, सीमा अशा २२ नावांनी मतदान केले आहे. या पोस्टनंतर काँग्रेसने दावा केला की, हीच ती मॉडेल आहे जिच्या नावाने बनावट मते टाकली गेली.

### खोटे सोने देवून

महिन्यात तुम्हाला जास्त सोनं देतो, पैसे जमा करा, त्या बदल्यात जास्त सोनं देतो'' असे खोटे आश्वासन देऊन दोन महिन्यात सर्व मिळून अडीच कोटी रुपयांचे घबाड जमा केले आणि येथील प्रॉपर्टी विकून पसार झाला. बीड येथील सर्व संपर्क त्याने तोडून टाकला. यामध्ये बीड शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. त्याने बीड येथील संपर्क तोडल्यामुळे त्याला शोधणे अवघड होते. परंतु गुप्त बातमीदाराने माहिती दिल्यानंतर त्याचा पुण्याचा पत्ता मिळाला. त्याने तेथेही सोनेचांदी विक्रीचे दुकान 'व्यंकटेश ज्वेलर्स' नावाने देहूगाव येथे चालू केले होते. त्याला तेथेच दुकानामध्ये बीड शहर पोलीस ठाण्याने नेमून दिलेल्या स्टाफकडून पकडण्यात आले आणि त्याच्या ताब्यातून १८ किलो चांदी जप्त करण्यात आली आहे. ज्या लोकांची फसवणूक केली होती त्या लोकांना यामुळे आता दिलासा मिळाला आहे.

सदरील कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार, पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि बाबा राठोड, पोलिस अंमलदार राम पवार, सुशेन उगले, शौकत शेख यांनी पार पाडली आहे.

यामधून लोकांना सूचित करण्यात येत आहे की खाजगी लोकांना कुठल्याही आमिषाला बळी न पडता स्वतःचे सोने गहाण ठेवू नये. सोनार आहे, दुकान आहे म्हणून विश्वास ठेवू नये. तसेच बँकांनाही सूचना देण्यात येत आहे की त्यांनी सोन्याचे परीक्षण करणारा नेमताना किंवा सोने तपासणीस नेमताना पूर्ण खात्री करून नेमावा आणि त्याच्या वर्तनावर सतत लक्ष ठेवावे.

### महाराष्ट्रात महावितरणच्या

घरगुती ग्राहकांच्या वीज वापरानुसार प्रति युनिट ३५ ते ९५ पैसे इतका इंधन अधिभार आकारण्यात आला होता. पण नोव्हेंबर महिन्यामध्ये हा इंधन अधिभार शून्यावर आणण्यात आला आहे. त्यांच्या या निर्णयामुळेच महावितरणची वीज स्वस्त झाली असून बिलामध्ये १२ टक्क्यांनी कपात करण्यात आली आहे.

## सेवानिवृत्त लष्करी अधिकाऱ्याचे घर फोडून २७ तोळे लंपास

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शहरातील बुरूडगाव रस्ता परिसरात एका सेवानिवृत्त लष्करी अधिकार्याचे बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे २७ तोळ्याचे सोन्याचे व ४० ग्रॅमचे चांदीचे दागिने आणि २२ हजाराची रोख रक्कम असा एकूण ९ लाख ३९ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पांडुरंग नागु धोत्रे (वय ६७, रा. नक्षत्र मंगल कार्यालयापाठीमागे, बुरूडगाव रस्ता, अहिल्यानगर) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. धोत्रे हे सैन्यदलातून सुभेदार पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. धोत्रे २६ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२२ दरम्यान बाहेरगावी गेल्यामुळे त्यांचे घर बंद होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



# वडवणीत वंदे मातरम् सार्ध शताब्दी महोत्सवाचे आयोजन

## शैक्षणिक संस्थांमध्ये गरजणार वंदे मातरमचे सुर – गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे

वडवणी । प्रतिनिधी

देशभक्तीच्या ओजस्वी परंपरेचा गौरवशाली ठेवा असलेले वंदे मातरम्? हे गीत यंदा १५० वर्षे पूर्ण करत आहे. या ऐतिहासिक उपलब्धीनिमित्ताने वडवणी येथे वंदे मातरम्? सार्धशताब्दी महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमात सुमारे ५ हजार विद्यार्थी आणि नागरिक सामूहिकरित्या वंदे मातरम्? हे गीत गायन करणार आहेत. तसेच वडवणी तालुक्यातील सर्व व्यवस्थापनांच्या शैक्षणिक संस्थांमध्येही त्या दिवशी एकाच वेळी वंदे मातरम्? गीताचे सामूहिक गायन केले जाणार आहे. त्याचबरोबर देशभक्तीपर विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आलेले आहे. तरी वडवणी तालुक्यातील सर्व शाळांमध्ये लोकप्रतिनिधी, शासकीय कर्मचारी, नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन वडवणी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी केले आहे.



वडवणी येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली या उपक्रमा संदर्भात बैठक मंगळवार दि.४ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडली. या बैठकीत कार्यक्रमाचे सविस्तर नियोजन, आयोजन, जबाबदाऱ्या, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था व सामाजिक संघटनांचा सहभाग निश्चित करण्यात आला. दि.७ नोव्हेंबर २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ९:३० वाजता वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात शहरातील हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. त्याचप्रमाणे तालुक्यातील सर्व व्यवस्थापनांच्या प्रत्येक शैक्षणिक संस्था शाळांमध्येही अगदी त्याच वेळेला या वंदे मातरम्? गीताचे गायन केले जाणार असून या कार्यक्रमात देशभक्तीपर लघुनाटिका, व्याख्यान, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन स्व.महिपती गणपतराव कोठुळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे. या संस्थेने तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था आणि नागरिकांना सक्रिय सहभागासाठी आवाहन केले आहे. गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील या बैठकीस वडवणी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, केंद्रिय मुख्याध्यापक, सर्व खाजगी शाळांचे मुख्याध्यापक, महाविद्यालयांचे प्राचार्य व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन, विद्यार्थ्यांच्या सहभागाचे समन्वयन, आणि सांस्कृतिक सादरीकरणांच्या वेळापत्रकाचा आढावा घेण्यात आला. गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी यावेळी सांगितले की, वंदे मातरम्? हे गीत आपल्या स्वातंत्र्य लढ्यातील प्रेरणादायी प्रतिक आहे. या गीताच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त वडवणी तालुका देशभक्तीच्या एका सुरात सामील होणार आहे. याप्रसंगी वडवणी शहरातील मुख्य कार्यक्रमासह तालुक्यातील प्रत्येक गावातील शाळांमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधी, इतर शासकीय कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी, माजी सैनिक, पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून इतिहासातील हा क्षण साक्षीभावाने अनूभवावा. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वडवणी तालुक्यात देशभक्तीचे वातावरण निर्माण होवून युवकांमध्ये राष्ट्रभावनेचा नवा उत्साह निर्माण होईल, अशी भावना यावेळी गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

## जयदत्त धस यांना पाटोद्यात हजारो कार्यकर्त्यांकडून पुस्तकांची भेट

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी काही वर्षांपूर्वी सुरू केलेली हार-पुष्पगुच्छ-शालीऐवजी पुस्तक भेट देण्याची परंपरा आजही धस कुटुंबाकडून कायम आहे. विचारांचा आणि ज्ञानाचा हा वारसा त्यांचे सुपुत्र जयदत्त धस यांनीही जपला आहे.

मंगळवारी पाटोदा येथे जयदत्त धस यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात तालुकाभरातून आलेल्या हजारो कार्यकर्त्यांनी त्यांना पुस्तकांची भेट देऊन शुभेच्छा अर्पण केल्या. विशेष म्हणजे, या सर्व पुस्तकांचा वापर नंतर गरजू विद्यार्थी, शाळा आणि वाचनालयांना भेट म्हणून केला जाणार आहे. धार्मिक ऐतिहासिक महापुरुषांची चरित्रे वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी महत्त्वाची ठरणारी वेगवेगळ्या विषयावरील पुस्तके युवा नेते जयदत्त धस यांना भेट म्हणून कार्यकर्त्यांनी दिली आहेत. या सर्व भेटी स्वीकारून जयदत्त धस यांनी शुभेच्छांचा स्वीकार केला. याप्रसंगी हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते, पाटोदा येथील भाजपाच्या कार्यालयात उपस्थित होते.




## प्रभाग क्र.१३ मध्ये सय्यद अफसाना सलीम ( बापू) यांच्या उमेदवारीला पसंती

### सलीमबापूंच्या ४० वर्ष समाज सेवेमुळे पत्नी सय्यद अफसाना यांना वाढता पाठिंबा

माजलगाव । प्रतिनिधी

नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक १३ मध्ये निवडणुकीची चुरस रंगू लागली असून, सय्यद अफसाना सलीम(बापु) यांच्या ओपन महिला उमेदवारीकडे मतदारांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. समाजात शांत स्वभाव,सर्वधर्म समभावाचा संदेश आणि विकासकामातील सातत्य यामुळे त्यांना स्थानिकांचा आपलीच उमेदवार असा विश्वास लाभला आहे.पती सय्यद सलीम बापू यांनी गेल्या ४० वर्षांत केलेली समाजसेवा,गरजूंना दिलेले सहकार्य आणि सर्व पक्षीय नेत्यांशी जुळवून घेतलेले सलोख्याचे संबंध, हे सय्यद अफसाना सलीम यांच्या प्रचारात मोठं भांडवल ठरणार आहेत. गेल्या ४० वर्षापासून शहरात सलीम बापू लोक संपर्कात असून समाजसेवेचे काम करताना दिसतात.प्रभाग क्रमांक १३ मध्ये तर सलीम बापू म्हणजे मदतीचा हात आणि अफसाना बाई म्हणजे घराघरात ओळखलेला विश्वास आहे.या प्रभागात त्यांनी ओपन महिलांमध्ये उमेदवारी दाखल



करण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या निर्णयाचे वार्डात सर्वत्र स्वागत होत असून त्यांना प्रथम क्रमांकाची पसंती मिळत आहे. प्रभागातील महिला मतदारांकडून त्यांना विशेष पाठिंबा मिळत असून,महिलांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेणारी उमेदवार अशी त्यांची ओळख तयार होत आहे. त्याचप्रमाणे पती सय्यद सलीम बापू यांनी वार्डात अनेक गरिबांची कामे केली आहेत.त्यांना पीटीआर मिळवून देणे,घरकुल मिळवून देणे, शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे.प्रभागातील विविध नागरी समस्येसाठी जनआंदोलने ही त्यांनी केली आहेत.गेल्या ४० वर्षापासून त्यांनी या ठिकाणी समाजकार्यात स्वतःला झोकुन दिले आहे. गरिबांचा मशीहा म्हणून त्यांची याठिकाणी ओळख आहे.यापूर्वी त्यांनी केलेले वार्डातील नगरसेवक म्हणून विकास कामे अनेकांच्या स्मरणात आहेत.त्यामुळे होऊ घातलेली प्रभाग क्रमांक १३ मधील महिला ओपनची निवडणूक जनतेने हाती घेतल्याची स्थिती असून त्यांना प्रभावात सर्वत्र वाढता पाठिंबा मिळत आहे.

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. वसंत एस. यादव साहेब, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६५१/२०२५**

**चंद्रकला व इतर वि. निरंक**

**(मार्फत ॲड: आर. आर. शिंदे बीड)**

ज्याअर्थी मयत नामे **बाबासाहेब वामन शेंदाडे रा. पिंपरगव्हाण ता.जि. बीड** हे दि. २८.११.२०२३ रोजी मौजे पिंपरगव्हाण ता.जि. बीड येथे मयत झाले आहेत.

**अर्जदार : १) चंद्रकला भ्र. बाबासाहेब शेंदाडे, वय-७६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. पिंवरगव्हाण, ता.जि.बीड. २) मंगलाबाई भ्र. बारीकराव आरेकर, वय-५७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. पिंपरगव्हाण, ता.जि. बीड. ३) पुष्पा भ्र. रामहरी चौरे, वय-४० वर्षे, धंदा-घरकाम, रा. तळेगाव, ता. जि. बीड. ४) लताबाई भ्र. सुर्यभान कोकाटे, वय-५२ वर्षे, धंदा-घरकाम. रा. धनगरवाडी पो.रायमोह, ता. जि. बीड. ५) पांडुरंग पि. बाबासाहेब शेंदाडे, वय-३३ वर्षे, धंदा-शेती, रा. पिंपरगव्हाण, ता.जि. बीड. ६) तुकाराम पि. बाबासाहेब शेंदाडे, वय-३१ वर्षे, धंदा-शेती, रा. पिंपरगव्हाण, ता.जि.बीड.**

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बाबासाहेब वामन शेंदाडे रा. पिंपरगव्हाण ता.जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज १/११/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : १६.१२.२०२५

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधीक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

स्वाक्षरित
**क. लिपीक**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६२०/२०२५**

**ॲड. शिंदे आर. आर.**

अर्जदार : १) अलकाबाई भ्र. विष्णुपंत सिराम, वय-६३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. आहेर चिंचोली, ता. जि. बीड. २) राधेश्याम पि. विष्णुपंत सिराम, वय-४७ वर्षे, धंदा-शेती व नौकरी, रा. आहेर चिंचोली, ता. जि. बीड ह. मु पिताजी आयकॉन सोसायटी बीड ता. जि. बीड. ३) रामेश्वर पि. विष्णुपंत सिराम, वय-४३ वर्षे, धंदा-शेती व नौकरी, रा. आहेर चिंचोली, ता. जि. बीड.

विरुध्द गैरअर्जदार

अर्जदार हे भारतीय आहेत प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे विष्णुपंत रंगराव सिराम यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे विष्णुपंत रंगराव सिराम, रा. आहेर चिंचोली, ता. जि. बीड हे दिनांक २६/१२/२०२३ रोजी येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील हे फार वर्षा पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक ०५/१२/२०२५ आज दिनांक ०५/११/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधीक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

स्वाक्षरित
**क. लिपीक**


## माजलगाव नगरपालिकेवर भगवा फडकविण्याचा शिवसेनेचा निर्धार

### इच्छुक उमेदवारांनी तात्काळ फॉर्म भरावे-तुकाराम येवले, धनंजय पापा सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

बहुप्रतीक्षित असणाऱ्या नगरपालिकेच्या निवडणुकांचे बिगुल अखेर वाजले असून, या पार्श्वभूमीवर शिवसेनेने पूर्ण ताकदीने मैदानात उतरायची घोषणा केली आहे. राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना प्रमुख नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब, शिवसेना सचिव संजय मोरे साहेब, मराठवाडा संपर्क मंत्री ना. संजय शिरसाट साहेब आणि संपर्क नेते अर्जुन खोतकर साहेब यांच्या आदेशानुसार शिवसेना विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब, जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्व, मार्गदर्शनाखाली माजलगाव नगरपालिकेची निवडणूक पूर्ण ताकदीने लढविण्यात येणार आहे.

या निवडणुकीत महायुतीला प्राधान्य देऊ अन्यथा स्वबळावर लढून माजलगाव नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकविणार



असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. तसेच, नगरपालिकेच्या इच्छुक उमेदवारांना त्वरित आपले अर्ज भरून शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे जमा करण्याचे आवाहन माजलगाव तालुका प्रमुख तुकाराम येवले, शहराध्यक्ष धनंजय पापा सोळंके यांनी केले आहे. या घोषणेमुळे माजलगाव तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असून, आगामी निवडणुकीत शिवसेनेचा झेंडा नगरपालिकेवर फडकविण्याच्या तयारीला वेग आला आह. याबरोबरच माजलगाव शहरासमोरील काही महत्त्वाच्या स्थानिक प्रश्नांवरही शिवसेना गांभीर्याने लक्ष देत आहे. शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक आणि मौलाना आझाद चौकापर्यंतच्या प्रमुख रस्त्यातील नाल्यांचा प्रश्न अद्याप प्रलंबित असून त्याचे नियोजनबद्ध निराकरण करणे गरजेचे आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांच्या स्मारकांचे सुशोभीकरण आणि देखभाल करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. शहरात बुधवार आणि रविवार असे आठवड्यातील दोन आठवडे बाजार भरतात, परंतु आठवडी बाजाराचा प्रश्न अद्याप मार्गी लागलेला नाही. नाट्यगृहाचे भूमिपूजन झाले असले तरी सुसज्ज नाट्यगृहाची आवश्यकता आजही भासते. तसेच शहराला नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी जलकुंभाची आवश्यकता असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. शहरातील ओपन स्पेसवरील अतिक्रमणे काढून सुसज्ज उद्यान व पार्क निर्माण करणे ही देखील नागरिकांची प्रमुख मागणी आहे.

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१०७९**
**दिनांक - २७/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती विलास रामनाथ ठाकरे रा. शिराढोण ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या आजी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जाणकाबाई पुंजाराम ठाकरे | आजी | २०/००/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या ार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-९९३**
**दिनांक - ०७/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती अशोक शेषराव जाधव रा. दहिगव्हाण खु. ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या नात जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | परी सुनिल जाधव | नात | २१/०७/२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या ार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-९९८**
**दिनांक - २७/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रविंद्र ज्ञानेश्वर जाधव रा. मसई ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तनु रविंद्र जाधव | मुलगी | १४/०६/२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-९९९**
**दिनांक - २७/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रविंद्र ज्ञानेश्वर जाधव रा. मसई ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | चंद्रकांत रविंद्र जाधव | मुलगी | ०३/१०/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# कापसाची खरेदी मर्यादा यंदा कमी असल्याने रोष

## शेतकऱ्यांनी खरेदीची मर्यादा वाढविण्याची केली मागणी

पुणे : खुल्या बाजारात भाव कमी असल्याने शेतकरी कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला (सीसीआय) हमीभावाने कापूस विक्री करत आहेत. मात्र, सीसीआयने यंदा खरेदीची हेक्टरी मर्यादा कमी केली आहे. राज्यातील महत्त्वाच्या कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये हेक्टरी १२ ते १५ क्विंटलपर्यंत खरेदीची मर्यादा आहे. राज्य सरकारने दिलेल्या उत्पादकतेच्या आधारेच मर्यादा ठरविल्याचे सीसीआयने सांगितले.

सीसीआयने राज्यात १५ ऑक्टोबरपासून कापसाची हमीभावाने खरेदी सुरू केली. खुल्या बाजारात कापसाचा भाव प्रति क्विंटल ६५०० ते ७ हजारांच्या दरम्यान आहे. त्यामुळे शेतकरी सीसीआयला हमीभावाने कापूस विक्री करत आहेत. पण सीसीआयने यंदा कापूस खरेदी करताना हेक्टरी खरेदीची मर्यादा खूप कमी केली आहे. राज्यातील महत्त्वाच्या कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये अगदी १२ ते १५ क्विंटलपर्यंत खरेदीची मर्यादा घालण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना या मर्यादेपलीकडे हमीभावाने कापूस विकता येणार नाही. गेल्या वर्षीपर्यंत सीसीआयकडून खरेदीची मर्यादा ठरवली जात होती. पण यंदा सीसीआयने राज्यातील कापूस उत्पादक जिल्ह्यांमधील उत्पादकतेच्या आधारे कापूस खरेदीचा निर्णय घेतला. त्यासाठी राज्याच्या कृषी विभागाकडून जिल्हानिहाय उत्पादकतेची आकडेवारी मागविण्यात आली. या उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार जिल्हानिहाय कापूस खरेदीची मर्यादा देण्यात आली. राज्याच्या कृषी विभागाने सीसीआयला हेक्टरी रुई उत्पादकतेची माहिती दिली. एक क्विंटल कापसामध्ये सरासरी ०.३३ टक्के रुई गृहीत धरून जिल्हानिहाय उत्पादकतेची मर्यादा ठरविण्यात आली आहे. मात्र शेतकऱ्यांच्या मते अनेक भागांत हेक्टरी उत्पादन २० ते २९ क्विंटल दरम्यान येत आहे. जालना, अहिल्यानगर, धुळे, जळगाव जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनीही खरेदीची मर्यादा वाढविण्याची मागणी केली आहे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६० : अब्राहम लिंकन अमेरिकेचे १६ वे अध्यक्ष म्हणून निवडून आले.
१८८८ : महात्मा गांधींनी कायद्याच्या अभ्यासासाठी लंडन येथे प्रवेश घेतला.
१९१२ : भारत या पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.
१९१३ : दक्षिण आफ्रिकेत भारतीय वंशाच्या खाणकामगारांच्या मोर्चाचे नेतृत्त्व केल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.
१९५४ : मुंबई राज्यात मुंबई वीज मंडळ या दिवशी स्थापन करण्यात आले.
१९९६ : अर्जेंटिनाचे गांधी म्हणून ओळखले जाणारे प्रा. अडोल्फो डी. ओबिएृता यांना पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या हस्ते जमनालाल बजाज आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान.
१९९९ : विकसनशील देशांना जैवतंत्रज्ञानाचा लाभ उपलब्ध करुन दिल्याबद्दल भारताचे वैज्ञानिक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना युनेस्को गांधी सुवर्णपदक जाहीर.
२००१ : संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे महासंचालक डॉ. वासुदेव अत्रे यांना प्रतिष्ठेचा वाय. नायडुम्मा स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला.
२०१२ : बराक ओबामा आणि जो बिडेन यांची दुसर्यांदा अनुक्रमे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि उपराष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१४ : सॅक्सोफोन या वाद्याचे जनक ॲडोल्फ सॅक्स यांचा जन्म. (मृत्यू: ४ फेब्रुवारी १८९४)
१८३९ : प्राच्यविद्या संशोधक, पहिले भारतीय पुरतत्त्वज्ञ भगवादास इंद्रजी यांचा जन्म.
१८६१ : बास्केटबॉल खेळाचे निर्माते जेम्स नास्मिथ यांचा जन्म. (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९३९)
१८८० : निसान मोटर कंपनीचे संस्थापक योशूसुका अकावा यांचा जन्म. (मृत्यू: १३ फेब्रुवारी १९६७)
१८९० : कविभूषण बळवंत गणेश खापर्डे यांचा जन्म.
१९०१ : जेष्ठ टीकाकार, समीक्षक विचारवंत श्री. के. क्षीरसागर यांचा जन्म. (मृत्यू: २९ एप्रिल १९८०)
१९१५ : चित्रपट कथाकार, दिग्दर्शक दिनकर द. पाटील यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च २००५)
१९२६ : पत्रकार,कथाकार,कादंबरीकार प्रभाकर नारायण पाध्ये उर्फ भाऊ पाध्ये यांचा मुंबई येथे जन्म.
१९२६ : अमेरिकन लेखक झिग झॅगलर यांचा जन्म. (मृत्यू: २८ नोव्हेंबर २०१२)
१९६८ : याहू चे संस्थापक यारी यांग यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७६१ : मराठेशाहीतील प्रसिद्ध राजकारणी (मराठा साम्राज्यातील ४ थी छत्रपती) महाराणी ताराबाई भोसले यांचे निधन.
१८३६ : फ्रान्सचा राजा चार्ल्स (दहावा) यांचे निधन. (जन्म: ९ ऑक्टोबर १७५७)
१९८५ : प्रसिद्ध अभिनेते संजीवकुमार यांचे निधन. (जन्म: ९ जुलै १९३८)
१९८७ : मराठी रंगभूमीवरील अभिनेते,दिग्दर्शक, लेखक आणि पीडीए (प्रोग्रेसिव ड्रॅमॅटिक असोसिएशन) चे संस्थापक प्रा.भालबा केळकर यांचे पुणे इथे निधन. (जन्म: २३ सप्टेंबर १९२०)
१९९२ : संगीत रंगभूमीवरील गायक,अभिनेते जयराम शिलेदार यांचे पुणे इथे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १९१६)
१९९८ : कॉन्टिनेन्टल प्रकाशन चे संस्थापक अनंतराव कुलकर्णी यांचे निधन. (जन्म: १९ सप्टेंबर १९१७)
२००२ : स्वत:च्या सुवाच्य अक्षरात हिंदीत राज्यघटना लिहिणारे वसंत कृष्ण वैद्य यांचे निधन.
२०१० : पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे यांचे निधन. (जन्म: २० ऑक्टोबर १९२०)
२०१३ : भारतीय शेफ तरला दलाल यांचे निधन. (जन्म: ४ जुन १९३६)

# हूमणी अळीच्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाय ‘प्रकाश सापळा’



भारतात, हूमणी अळीचा प्रादुर्भाव विविध पिकांवर आढळतो. यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान सुद्धा होते. या किडीच्या नियंत्रणासाठी पीक लागवड पूर्वी पासून एकात्मिक नियंत्रण उपाय करणे गरजेचे असते. कारण वेगवेगळ्या अवस्थेत या किडी पिकांना नुकसान पोहोचवितात. उभ्या पिकात प्रौढ हूमणी अळीचे नियंत्रण करण्यासाठी ‘प्रकाश सापळा’ हा सर्वात चांगला उपाय असून अगदी कमी पैशात सहज करता येणारा आहे.

हूमणी अळीमुळे पिकांचे होणारे नुकसान : खोड, मुळ्या फस्त करते हूमणी: हूमणी अळीपूर्वीची पतंग ही त्याची प्राथमिक अवस्था असते. खरीप हंगामात ज्यावेळी पाऊस पडत नाही आणि अवर्षणजन्य स्थिती निर्माण होते. त्यावेळी हूमणी अळीचे पतंग जमिनीत अंडी घालतात आणि त्या अंड्यातून निघालेली हूमणी अळी ही खोड व मुळे फस्त करते. त्यामुळे शेतातील उभ्या पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. प्रादुर्भाव जास्त झाल्यास संपूर्ण शेतात वेगवेगळ्या जागी मोठ्या प्रमाणात झाडे वाळून जातात. विशेषत: ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात ह्या किडीमुळे होणारे नुकसान जास्त आढळून येते.

प्रकाश सापळ्यांचा वापर करून नियंत्रण : शेतकऱ्यांनी लिंबाच्या किंवा बाभळीच्या झाडाखाली संध्याकाळी शेतात प्रकाशासाठी बल्ब लावून त्याखाली पसरट भांड्यात पाणी ठेवून त्यावर ऑइल किंवा रॉकेलसारखे खनिज द्रव्याचा थर पसरावा. त्या प्रकाशामुळे पतंग बल्बकडे आकर्षित होऊन भांड्यातील पाण्यात पडून खनिज द्रव्यामुळे मरतात. या पद्धतीने हूमणी अळीचे नियंत्रण करता येते. अलीकडच्या काळात प्रकाश आणि गंध सापळा यांना एकत्रित करून एक नवीन प्रकाश-फेरोमोन कॉम्बो कीटक सापळा विकसित करण्यात आलेला आहे. हा सापळा पर्यावरणास अनुकूल, असून हूमणी अळीचे नियंत्रण करण्यास कार्यक्षम आहे.

# मोसंबी फळगळीची कारणे आणि उपाययोजना

ेसंबीच्या अंबिया बहाराची फळगळ ही एक मोठी समस्या मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांसमोर निर्माण हेताना दिसत आहे. फळगळ होण्याची विविध कारणे जाणून घेतली तर त्यावर उपाय करणे सहज शक्य आहे.

वनस्पती शास्त्रीय आंतरिक फळगळ : पावसाळ्यात जमिनीत सतत पाणी साचून राहल्याने झाडाच्या मुळ्यां कुजतात, मुळ्यांना प्राणवायू अल्प किंवा मिळत नसल्याने फळांवर त्यांचा परिणाम होऊन ती पिवळी होऊन गळून पडतात. बुरशीजन्य फळगळ: बुरशीजन्य फळगळ प्रामुख्याने फायटोप्थोरा, कोलेटोट्रीकम, डिप्लोडिआ व ऑल्टरनेरिया या बुरशीमुळे होते. या बुरशीचे संक्रमण फळांवर होऊन आर्थिक नुकसानकारक फळगळ आढळून येते.

किटकजन्य फळगळ : फळझाडांवर प्रादुर्भाव करणाऱ्या फळमाशी तसेच रस शोषक पतंगामुळे फळगळ दिसून येते.

शास्त्रीय आंतरिक फळगळ व्यवस्थापन : शेतातील पाणी बाहेर काढावे, पाणी साचून राहिल्यास बागेमध्ये तणनाशकाचा वापर टाळावा. गळून पडलेल्या फळांना खोल खड्यात दाबून त्यांची विल्हेवाट लावावी. एनएए १ ग्रॅम (१० पीपीएम) किंवा २-४ डी १.५ ग्रॅम (१५ पीपीएम) किंवा जिब्रेलिक ॲसिड १.५ ग्रॅम (१५ पीपीएम) सह एन एटीसीए (१० पीएम) १ ग्रॅम + ब्रासिनोलाइड (४ पीपीएम) ०.४ ग्रॅम + फॉलिक ॲसिड (१०० पीपीएम) १० ग्रॅम + १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून १५ दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. सूक्ष्म अन्नद्रव्ये झिंक सल्फेट ५ ग्रॅम, फेरस सल्फेट १ ग्रॅम व बोरॉन १ ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन अंबिया फळांकरिता ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात तसेच मृगाच्या फळाकरिता ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये फवारणी करावी.



बुरशीजन्यरोगापासून होणारी फळगळ व्यवस्थापन : फायटोफ्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या पानगळ व फळावरील तपकिरी कुज ब्राऊन रॉट’ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर फोसिटिल एएल’’ २.५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. तसेच या द्रावणांची फवारणी करीत असताना वाफ्यात सुद्धा यांची जमिनीवर फवारणी करावी. बुरशीनाशकाचे द्रावण टाकल्या नंतर ५ दिवसांनी १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व १०० ग्रॅम सुडोमोनास १ किलो शेणखतात मिसळून प्रति झाड देण्यात यावे. कोलेटोट्रीकम बुरशीजन्य फळगळसाठी बोर्डेक्स ०.६ टक्के मिश्रणाची किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी २.५ ग्रॅम किंवा अझोक्सस्ट्रोबिन + डायफेनकोणाझोल १ मिलि प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.

किटकजन्य फळगळ व्यवस्थापन : फळ हिरव्या रंगामधून पिवळसर रंगामध्ये रूपांतर होत असताना १०-१५ दिवसाच्या अंतराने फळ तोडणी होईपर्यंत ५ टक्के निंबोळी अर्क (५०० ग्रॅम/१० लिटर पाणी) किंवा निंबोळी तेल (नीम ऑइल) १० मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फळमाशीच्या नरांना आकर्षित करण्याकरिता फळमाशी सापळे प्रति हेक्टरी २५ याप्रमाणात ऑगस्ट महिन्याच्या दुसर्या आठवड्यापासून किंवा तोडणीच्या साधारण २ महिने आधीपासून बागेत झाडांवर टांगून ठेवावेत. साधारणतः सायंकाळीच्या वेळी बागेच्या बांधावर गवत पेटवून धूर करावा. रसशोषण करणाऱ्या पतंगाकरिता विषारी आमिषे तयार करुन बागेत ठेवावे. याकरिता २० ग्रॅम मॅलॅथिऑन ५० ईसी २० मिली + २०० ग्रॅम गूळ + खाली पडलेल्या फळांचा रस (४०० ते ५०० मिलि) २ लिटर पाण्यात मिसळून प्रत्येकी दोन आमिषे रूंद तोंडाच्या पसरट भांड्यात टाकून २५ ते ३० झाडामध्ये १ याप्रमाणे लटकुन ठेवावेत.

# काकडीची अधिक उत्पन्न देणारी जात आणि खास वैशिष्ट्ये

भारतात जवळपास सर्व राज्यात काकडीची लागवड केली जाते. उत्तरेकडील मैदानी भागात, वसंत ऋतु-उन्हाळा आणि खरीप हंगामात शेतकरी साधारणपणे दरवर्षी दोन काकडीची पिके घेतात. ग्राहक सामान्यत: जास्त उत्पादन क्षमता असलेल्या लांब, दंड गोलाकार आणि मध्यम जाड काकडी खरेदीला प्राधान्य देतात.

‘पुसा लाँग ग्रीन’ काकडी : ही उच्च-उत्पन्न देणारी काकडीची जात असून ती पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार आणि झारखंडमधील शेतकर्यांमध्ये अधिक उत्पन्न देण्यासाठी विशेष लोकप्रिय आहे. काकडीच्या इतर वाणाच्या तुलनेत या काकडीच्या लागवडीतून चांगले उत्पादन मिळते. काकडीची पुसा लाँग ग्रीन ही जात दोन्ही हंगामांसाठी लागवड करता येणारी जात आहे.

पुसा लाँग ग्रीनची वैशिष्ट्ये : उत्तर प्रदेशातील सहारनपूर जिल्ह्यातील छुटमलपूर येथे पुसा लाँग ग्रीन ही जात निवड प्रक्रियेद्वारे विकसित करण्यात आलेली आहे. या जातीच्या पिकाला ३-४ शाखा आणि २.०-२.५ मीटर लांबीच्या वेली असतात. पाने मध्यम हिरवी असतात, या जातीत नर फुले पुंजक्यामध्ये आणि मादी फुले



एकाकी येतात. फळे हलक्या हिरव्या रंगाची असतात ज्यात हलके पांढरे-हिरवे पट्टे असतात आणि देठाच्या टोकाजवळ तपकिरी-हिरव्या डाग असतात. फळांची लांबी १५-१८ सेमी असते, फळांवर लव नसते, त्वचा मऊ असते. फळांचे सरासरी वजन १५०-१६० ग्रॅम असते.

पुसा लाँग ग्रीनची उत्पादकता : २०१५-१६ ते २०१७-१८ पर्यंत, पुसा लाँग ग्रीनची चाचणी (भाजीपाला पिके) चाचण्यांचा भाग म्हणून भारतातील अनेक केंद्रांवर करण्यात आली. निकालांवरून असे दिसून आले की पुसा लाँग ग्रीनचे प्रति हेक्टर १८.९३ टन उत्पादन मिळते, जे पंत खिरा-१ या जातीपेक्षा ३४.९३% जास्त आहे. पुसा लाँग ग्रीन फळांची सरासरी लांबी १८.६० सेमी आणि फळांचे सरासरी वजन १६१.३५ ग्रॅम होते.

# लिंबूवर्गीय फळ पिकांमध्ये उंच वाफे लागवड प्रणाली

भारतातील एकूण फळपिक क्षेत्रापैकी सुमारे ४.८३ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये लिंबूवर्गीय पिकाची लागवड केली जात असून एकूण उत्पादन सुमारे ४२.८ लाख टन एवढे आहे. भारतातील एकूण नागपुरी संत्राचे १४७२४०१ टन उत्पादन असून १६५३७६ हेक्टर क्षेत्र आणि १०.० टन/हेक्टर उत्पादकता आहे, जे ब्राझील, चीन, मेक्सिको आणि स्पेन सारख्या इतर विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी (३०-४० टन/ हेक्टर) आहे.

सर्व लिंबूवर्गीय उत्पादक राज्यांपैकी, महाराष्ट्र राज्यात लिंबूवर्गीय पिक क्षेत्र (१.६० लाख हेक्टर) व उत्पादन (६.२ लाख टन) या बाबतींत एक आघाडीचे राज्य आहे. भारतात लिंबूवर्गीय फळे म्हणजे संत्रा, मोसंबी आणि लिंबू त्यांच्या अंतर्गत एकूण क्षेत्रफळाच्या (३.४८ लाख हेक्टर) अनुक्रमे ५०, २० आणि १५ टक्के आहे. भारतातील लिंबूवर्गीय फळांच्या लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकी सुमारे ४२% क्षेत्र संत्रा पिकाने व्यापलेले आहे. मोसंबी (सायट्रस सायनेन्सिस) हे राज्यातील सर्वात प्रचलित लिंबूवर्गीय फळ असून ते महाराष्ट्राच्या विदर्भ भागात आणि मध्य प्रदेशच्या लगतच्या भागात मोठ्या प्रमाणावर घेतले जातात.

उंच वाफा : उंच वाफा ही एक आधुनिक लागवड पद्धत आहे, ज्यामध्ये जमिनीच्या क्षेत्रफळानुसार १-२ मीटर रुंदीचे उंच वाफे तयार केले जातात. ही पद्धत कमी पाण्याच्या भागात फळझाडांच्या लागवडीसाठी वापरली जाते. मुसळधार पाउस असलेल्या भागातही या पद्धतीत



झाडे उंच वाफ्यावर न कोसळता वाढू शकतात तसेच पाण्यासोबत खते वाहून जाणे, मूळकुज होणे इत्यादी नुकसान टाळले जातात. उंच वाफा पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे सरींमध्ये पाणी साचले जाते व त्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढते.


उंच वाफा लागवड पद्धतीची आवश्यकता : उंच वाफ्यावर फळझाडे वाढवण्याचे अनेक फायदे आहेत जसे की वसंत ऋतूमध्ये माती लवकर तापते, त्यामुळे लवकर लागवड करता येते, पाण्याचा सहज निचरा होऊ शकतो. लिंबूवर्गीय फळ झाडांची मुळे जमिनीत जास्त खोलवर जात नाहीत. त्यामुळे उंच वाफ्यातील पाणी, खते व पोषक द्रव्य यांचा झाडांच्या वाढीसाठी पुरेपूर उपयोग होतो. झाडांच्या वाढीसाठी मोकळी माती आवश्यक असते कारण मोकळ्या मातीमध्ये झाडाच्या मुळांना वाढण्यासाठी भरपूर जागा मिळते. पारंपारिक पद्धतीपेक्षा उंच वाफे पद्धत अधिक फायदेशीर ठरते. उंच वाफ्यांमुळे शिसे आणि इतर जड धातूंनी दूषित असलेल्या जमिनीवरही झाडांची सुरक्षितपणे वाढ होणे शक्य होते. या पद्धतीमुळे मातीची सुपीकता आणि गुणवत्ता सुधारते तसेच मातीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मात वाढ होते व क्षारतेची समस्या कमी होते. सुधारित पाणी व्यवस्थापन, उत्तम पाण्याचा निचरा व साठवण, कमी बाष्पीभवन तसेच वारा/पाणी यांची धूप कमी होते.

भाजीपाल्याची आंतरपीके : उंच वाफ्यावर लिंबूवर्गीय फळझाडांच्या लागवडीला चाळ क्षेत्रात भाजीपाला आंतरपीक घेण्यास वाव आहे. आयसीएआर-सीसीआरआयच्या प्रयोगाने शेतकऱ्यांना नवा मार्ग दाखवला आहे. २०२० मध्ये टोमॅटो, वांगी भेंडी, कोबी आणि मुळा या भाज्यांचे उत्पादन घेण्यात आले. टोमॅटो, वांगी, भेंडी आणि झेंडूच्या फुलांनीही मर्यादित क्षेत्रात (५०३० चौ.मी.) एवढी उत्पादकता दाखवून चांगली कामगिरी केली आहे. वी.एन.आर. हर्ष आणि एन.एच.बी. १००१ या जातीच्या वांग्याच्या रोपांची लागवड जून २०२० मध्ये ९०६० सें.मी. अंतरावर (रो टू रो आणि प्लांट टू प्लांट) करण्यात आली आणि कापणी जुलै महिन्यात सप्टेंबर पर्यंत सुरू झाली (२०२०) आणि जवळपास, हंगामात ३५ (टन/ हेक्टर) उत्पन्न मोजले गेले.

अभिलाष जातीच्या टोमॅटोच्या एकूण ३५० रोपांची जानेवारी महिन्यात (२०२०) ६० ४५ सें.मी. अंतरावर (रो टू रो आणि प्लांट टू प्लांट) अंदाजे लागवड करण्यात आली. २५ टन / हेक्टर उत्पादन मोजले गेले. २०२० मध्ये प्रति हेक्टर क्षेत्राच्या आधारावर सुमारे ४.२९ टन/हेक्टर भेंडी, २० टन/हेक्टर फुलकोबी, २५ टन/हेक्टर पानकोबी आणि १२ टन/हेक्टर मुळा उत्पादनाची गणना करण्यात आली.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत






# उत्कृष्ट कामगिरी बजविल्यामुळे पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांना श्रेणीवाढ

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांना जिल्ह्यात उत्कृष्ट कामगिरी बजल्यामुळे महाराष्ट्र शासनाने वेतन श्रेणीवाढ दिली असून, यासंदर्भातील आदेश पोलीस प्रशासनाला प्राप्त झाले आहेत. श्री. बन्सल हे दि. ५ फेब्रुवारी २०२४ रोजी जालन्यात रुजू झाले होते. पावणेदोन वर्ष येथे कामकाज पाहिल्यानंतर त्यांना श्रेणीवाढ मिळाली असून, यापुढेही ते जालन्यातच कार्यरत राहणार आहेत.आंतरवाली सराटी येथे मराठा आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीहल्ल्यामुळे तत्कालीन पोलीस अधिक्षक तुषार दोषी यांना जबाबदार धरुन सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले होते. त्यामुळे रिक्त झालेल्या पदावर पुणे येथून शैलेश बलकवडे यांना प्रभारी म्हणून बोलावण्यात आले होते. श्री. बलकवडे यांनी त्यांच्या परीने प्रशासनावर



वचक निर्माण करण्याचा तसेच कायदा व सुव्यवस्था बऱ्यापैकी हाताळण्याचा प्रयत्न केला.

मात्र, २ ठिकाणचा कार्यभार आणि त्यातल्या त्यात जालन्याचा प्रभारी पद्धार असल्याने निर्णय घेतांना त्यांना मर्यादा येत होत्या. राजाश्रय लाभलेल्या काही चलाख अधिकाऱ्यांनी चालविलेल्या मनमानीला श्री. बलकवडे हे लगाम लावू शकले नव्हते. त्यांच्या काळात जालना शहरात भरदिवसा भररस्त्यात घडलेल्या १० लाखाच्या रोकड चोरीचा तपास लागु शकला नव्हता येण्यापुर्वी जिल्ह्याला हादरवून सोडणाऱ्या गजानन तौर हत्या प्रकरणात मुख्य आरोपीला पकडण्यात पोलिसांकडून दिरंगाई झाली होती.

एकुणच कार्यकाळ पाहता श्री. बलकवडे हे कायदा व सुव्यवस्था सांभाळण्यात अपयशी ठरले होते. दरम्यान, श्री. बलकवडे यांची पुणे येथे पदोन्नतीने बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी श्री. बन्सल यांना पाठविण्यात आले होते. रुजु झाल्यानंतर पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी जरांगे पाटलांचे आंदोलन आणि कायदा व सुव्यवस्था चांगल्याप्रकारे हाताळण्याचा प्रयत्न केला. सहकारी तसेच अधिनस्त अधिकारी कर्मचाऱ्यांच्या अडी-अडचणी समजून घेत निराकरणत करणारा, तसेच पाठिशी खंबीरपणे उभा राहणारा अधिकारी म्हणून श्री. बन्सल यांची ओळख आहे. एका शाळकरी मुलाचे खंडणीसाठी अपहरण झाल्यानंतर त्याच दिवशी त्याची सुखरुप सुटका करुन आरोपींना अटक करण्याची कामगिरी श्री. बन्सल यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे पार पाडण्यात पोलीस दलाला यश आले होते. त्याचबरोबर त्यांच्या आतापर्यंतच्या कार्यकाळात अनेक क्लिष्ट गुन्ह्याची उकल झाली आहे. श्री. बन्सल हे मितभाषी आणि सहज उपलब्ध होणारे अधिकारी असून, त्यांना श्रेणीवाढ मिळाल्याबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## पैठण नगरपरिषद निवडणुकीसाठी तीन महिला अधिकाऱ्यांची नियुक्ती

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

पैठण येथील नगरपरिषद विविध प्रभागांच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी निवडणूक कार्यक्रम निवडणूक आयोग निर्देशानुसार जाहीर करण्यात आला असून, या निवडणुकीचे कामकाज करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी महिला अधिकारी यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून, पैठण शहरातील नगराध्यक्ष व विविध प्रभागांच्या नगरसेवक पदासाठी होणाऱ्या निवडणुकीत आदर्श आचारसंहिता व निवडणूक कामकाज हाताळण्यासाठी जिल्हा अधिकारी दिलीप स्वामी यांनी पैठण न.प निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पैठण फुलंब्री उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांची, तर अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय



अधिकारी तहसीलदार ज्योती पवार यांच्यासह सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून पैठण नगरपरिषद प्रशासक मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्ती झालेल्या महिला अधिकाऱ्यांनी निवडणूक कामकाज पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विविध शासकीय कार्यालयांच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करून वेगवेगळे पथक तयार करण्यासाठी संयुक्त बैठक घेण्यासाठी तयारी सुरू केली आहे.

## आत्मनिर्भर भारत या विषयावर शास्त्रज्ञ देवधर यांचे व्याख्यान संपन्न



अंबड । प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व पवन करिअर अकॅडमी,अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने ''ऑपरेशन सिंदूर व आत्मनिर्भर भारत'' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात संरक्षण संशोधन व विकास संस्था (), पुणे येथील निवृत्त संचालक तथा डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे व्यवस्थापन परिषद सदस्य , गन एक्स्पर्ट श्री. काशिनाथ देवधर यांचे जाहीर व्याख्यान झाले . याप्रसंगी व्याख्याते श्री देवधर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी मुक्तपणे संवाद साधला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. केदारभाऊ मंत्री होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरचे सिनेट सदस्य प्रा. नाना गोडबोले व पवन करिअरचे संचालक सुरेश जगताप यांची व्यासपीठावर उपस्थिती होती . शास्त्रज्ञ श्री. देवधर यांनी आपल्या ४० वर्षांच्या डी आर डी ओ सेवाकालातील अनुभवाच्या आधारे 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेचा रोमहर्षक इतिहास व्हिडिओ आणि पीपीटी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर सादर केला. त्यांनी भारताने संरक्षण क्षेत्रात स्वदेशी क्षेपणास्त्रे, आधुनिक तंत्रज्ञान आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने केलेल्या प्रगतीबद्दल सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी माजी राष्ट्रपती डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाने त्यांनी संशोधित केलेली खांद्यावरील तोफ निर्मितीची कथा व तिचे कारगिल युद्धातील योगदान याविषयी त्यांनी माहिती दिली . कार्यक्रमादरम्यान त्यांनी तरुण विद्यार्थ्यांना विज्ञान, संशोधन व राष्ट्रसेवेच्या क्षेत्रात योगदान देण्याचे प्रेरणादायी आवाहन केले. या कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. नाना गोडबोले यांनी करून व्याख्यान आयोजनाचा हेतू स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन करिअर अकॅडमी चे संचालक श्री. योगेश शिकारे यांनी केले तर आभार प्रदर्शन अभाविप जालना जिल्हा सहसंयोजक माधव उद्देवाल यांनी मानले. अंबड परिसरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून व्याख्यानाचा लाभ घेतला.

## भोकरदन येथे नोंदणी शिबिरात भांड्याचा संच मिळाला नाही

जालना। प्रतिनिधी

भोकरदन येथे नोंदणी शिबिरात भांड्याचा संच ना मिळाल्यामुळे राहुल करनाडे यांनी मंडळाकडे तक्रार केली आहे. दि. ०३ नोव्हेंबर २०२५ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या गृहपयोगी संच वितरण योजनेत अनियमितता समोर आली आहे. जालना जिल्ह्यातील पृथ्वीराज राजपूत ( नोंदणी क्र. १९१७२००५०९२७) यांनी २३ ऑक्टोबर २०२५ रोजी भोकरदन मार्केट कमिटी गोडाऊनजवळील शिबिरात अंगठ्याचा ठसा आणि छायाचित्र दिले. मात्र, गृहपयोगी संच (३० भांड्यांचा किट) देण्यात आला नाही. यामुळे कामगाराला मोठा आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असून, राहुल करनाडे यांनी मंडळाच्या जालना कार्यालयाकडे तक्रार दाखल केली आहे.

पृथ्वीराज राजपूत (कामगार) यांनी सांगितले, ''शिबिरात बायोमेट्रिक पूर्ण झाले, तरी संच दिला नाही. मी दुसऱ्या दिवशी चौकशी केली, मात्र उत्तर मिळाले नाही. मजुरी करून कुटुंब चालवतो, हा संच मिळाला असता तर मोठी मदत झाली असती.'' मंडळाच्या नियमानुसार, शिबिरात नोंदणी केल्यानंतर संच तात्काळ किंवा लवकरात लवकर द्यावा. मात्र, अशा तक्रारी भोकरदन इथे वाढल्या आहेत. अनेक कामगारांना संच मिळाले नाहीत.तात्काळ चौकशी करून संच वितरित करावे, अन्यथा आंदोलन करण्यात येईल.

## आ. लोणीकरांच्या विकास कामामुळे, मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलला -राहुल लोणीकर

जालना। प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या विकास कामामुळे परतूर विधानसभा मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदललेला असून, त्यांनी केलेल्या अनेक विकासात्मक कामामुळे सर्वसामान्य जनता समाधानी असल्याचे मत भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी व्यक्त केले. ते मंठा तालुक्यातील गेवराई येथे सिमेंट रस्ता १० लक्ष रुपये, माळकिनी सिमेंट रस्ता १० लक्ष रुपये, वायाळ पांगरी येथे सिमेंट रस्ता पंधरा लाख रुपये भूमिगत नाणी बांधकाम १५ लक्ष रुपये नायगाव येथे सिमेंट प्रास्ता बांधकाम १० लक्ष रुपये आदि कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते



पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका नगरपालिकेच्या निवडणुका ह्या अत्यंत महत्त्वाच्या निवडणुका असून या निवडणुकीसाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या विकास कामे हाच भाजपाचा अजेंडा असेल असे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले पुढे बोलताना ते म्हणाले की आमदार बबनराव लोणीकरांनी दिन दुबळे दलितां साठी केलेले काम हे खूप मोठे असून यामुळे अनेकांना वैयक्तिक लाभ घेता आले असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना नमूद केले पुढे ते म्हणाले की अतिवृष्टी झाल्यावर गावागावातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन थेट त्यांच्या समस्या जाणून घेत प्रशासनातील अधिकाऱ्यांना कामाला लावून शेतकऱ्यांना न्याय द्यायला.

## खरबा येथील ग्रामपंचायत अधिकारी लाचलुचपतच्या जाळ्यात

परभणी । प्रतिनिधी

मानवत तालुक्यातील खरबा ग्रामपंचायत कार्यालयात लाच मागणी केल्याप्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी रमेश रंगनाथराव मुळे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ए.सी.बी.) परभणीच्या पथकाने सापळ्यात पकडले. संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्याला ताब्यात घेण्यात आले असून, ही सापळा कारवाई पंचासमक्ष पार पडली.

सदर प्रकरणाची माहिती अशी की, तक्रारदाराची पत्नी दि. २२ फेब्रुवारी रोजी आजाराने मृत्यू पावली होती. मृत्यूची नोंद करून मृत्यू प्रमाणपत्र घेण्यासाठी तक्रारदाराने दि. २३ ऑक्टोबर रोजी खरबा येथील ग्रामपंचायत कार्यालयात भेट दिली. त्यावेळी ग्रामपंचायत अधिकारी रमेश मुळे यांनी मृत्यू प्रमाणपत्र देण्याच्या बदल्यात ५०० रुपये मागितले. तक्रारदाराने नाइलाजास्तव ती रक्कम दिली. मात्र परत दि. २८ ऑक्टोबर रोजी ग्रामपंचायत अधिकारी यांनी पुन्हा ५०० रुपये मागितले. हे मागणे तक्रारदारास लाचविषयक वाटले आणि त्यांनी दि. ४ नोव्हेंबर रोजी परभणी येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली. त्यानंतर ए.सी.बी.चे उपअधीक्षक महेश पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तक्रारीची पडताळणी आणि सापळा कारवाई करण्यात आली. पंचासमक्ष कारवाईदरम्यान आरोपी ग्रामपंचायत अधिकारी रमेश मुळे यांनी तक्रारदाराकडून १ हजार रुपये स्वीकारले, ज्यावर त्याला ताब्यात घेण्यात आले.

## सीसीआयच्या जाचक अटी रद्द करुन कापूस खरेदी तात्काळ सुरु करा-अंबेकर

जालना। प्रतिनिधी

राज्य सरकारने सीसीआयमधील जाचक अटी मुळे शेतकऱ्यांची नुकसान होणार आहे सदरील अटी रद्द करून कापूस खरेदी केंद्र तात्काळ सुरु करण्यात यावे तसेच सीसीआयच्या जाचक अटी रद्द कराव्यात, अशी मागणी ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात श्री. अंबेकर यांनी पुढे म्हटले आहे की, यावर्षी जालना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्यामुळे जवळपास सर्वच पिके हातची गेली आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत सापडले असून, आता कापूस खरेदी केंद्र तरी वेळेवर सुरु झाले पाहिजेत; जेणेकरुन अगोदरच अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. पहिली वेचणी होऊन कापूस शेतकऱ्यांच्या घरात आला असलातरी जालना जिल्ह्यात अद्याप सीसीआयचे एकही खरेदी केंद्र सुरु झालेले नसल्यामुळे गरजवंत शेतकऱ्यांना खाजगीत कमी भावाने कापूस विकावा लागत आहे.



दरम्यान, खरेदी करताना शासनाच्यावतीने आर्द्रतेच्या टक्कवारीवरुनच कापसाची किंमत ठरविली जाणार असेल तर हमी भाव कसा मिळणार तसेच १२ टक्क्यांपेक्षा जास्त आर्द्रता असलेला कापूस खरेदी केला न गेल्यास शेतकऱ्यांनी या कापसाचे काय करायचे, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे आर्दतेची अट रद्द करावी. शेतकऱ्यांनी 'कपास किसान' ॲपवर नोंदणी केल्यानंतर पडताळणी करण्यासाठी केंद्राला तांत्रिकदृष्ट्या अडचण निर्माण होत असल्याने ही अट रद्द करण्यात यावी. एकरी ३ ते ६ क्विंटल पर्यंतच कापूस खरेदी करण्याच्या अटीमुळे एकरी १० क्विंटल उत्पादन झालेल्या शेतकऱ्याला उर्वरित कापूस नाईजाने खाजगी बाजारात कमी भावाने विकावा लागणार आहे. त्यामुळे क्विंटलच्या मर्यादेची ही अटही अट करावी. नसता सोयाबीन व मका प्रमाणेच शेतकऱ्यांना कापसातही मोठ्या प्रमाणावर नुकसान सहन करावे लागणार आहे, असे नमुद करुन श्री. अंबेकर यांनी पुढे म्हटले आहे की, एकीकडे शेतकऱ्यांना वेगवेगळ्या आश्वासनावर झुलवत ठेवले जाते तर दुसरीकडे शासन त्यांना कोंडीत पकडत असल्याचे दिसते. या सर्व अडचणींकडे आपण व्यक्तीशः लक्ष देवून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी श्री. अंबेकर यांनी या निवेदनाच्या शेवटी केली आहे.

# राहुरी कृषी विद्यापीठातील प्राध्यापकाला शेअर मार्केटच्या बहाण्याने ३ कोटींचा गंडा!

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अनोळखी नंबरवरून संपर्क केलेल्या व्यक्तीने व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये घेऊन त्यावर शेअर मार्केटमध्ये भरघोस परताव्याचे आमिष दाखविले. त्यावर विश्वास ठेऊन राहुरी कृषी विद्यापीठातील प्राध्यापकाने तब्बल ३ कोटी ३ लाख १५ हजार रूपयांचे शेअर्स व आयपीओ खरेदी केले. मात्र काही दिवसांनी परतावा मिळाला नाही व गुंतवणूक केलेली रक्कमही परत मिळाली नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित प्राध्यापकाने तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी साक्षी गुप्ता, जितेन दोषी व विक्रम शहा (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) व इतर अनोळखी यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. ६१ वर्षीय फिर्यादी सावेडी उपनगरातील रासनेनगर येथे राहतात. ते राहुरी कृषी विद्यापीठात प्राध्यापक म्हणून नोकरीला आहेत. त्यांना २ ऑगस्ट २०२५ रोजी '१९९९ इनाम मुव्हिंग फॉरवर्ड' नावाच्या एका व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये त्यांच्या संमतीशिवाय सामील करण्यात




आले. या ग्रुपवर जितेन दोशी नावाचा इसम शेअर मार्केटच्या वेगवेगळ्या स्टॉक बाबत व त्यातून झालेल्या फायद्याबाबत माहिती देत होता. त्या ग्रुपवरील मेसेज पाहून फिर्यादीचा विश्वास संपादन झाल्यानंतर, त्या ग्रुपची प्रमुख साक्षी गुप्ता हिने त्यांना 'इनाम' नावाचे एक बनावट ॲप डाऊनलोड करून घेण्यास सांगितले. फिर्यादीने ते ॲप डाऊनलोड करून घेतल्यानंतर त्यावर स्वतःची व बँकेची माहिती भरली. त्यानंतर, संशयित आरोपींनी सांगितलेल्या विविध १७ बँक खात्यांवर फिर्यादीने २० सप्टेंबर २०२५ ते २९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत वेळोवेळी एकूण ३ कोटी ३ लाख १५ हजार रूपयांची शेअर मार्केट व 'आयपीओ'मध्ये गुंतवणूक केली. पैसे गुंतवल्यानंतर, फिर्यादीला त्या अॅपवर तब्बल २२ कोटी २९ लाख १९ हजार ६५५ रूपयांचा फायदा झाल्याचे दिसू लागले.

मात्र, २९ ऑक्टोबर २०२५ रोजी जेव्हा त्यांनी ही फायद्यातील रक्कम काढण्याचा प्रयत्न केला, तेव्हा संशयित आरोपींनी त्यांना 'इनाम सेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड'च्या नावाने एक बनावट सर्व्हिस चार्ज नोटीफिकेशन पत्र पाठवले. यात, पैसे काढण्यासाठी १५ टक्के सेवा शुल्क म्हणून ३ कोटी ३४ लाख ३७ हजार ९४८ रूपये अतिरिक्त भरण्याची मागणी करण्यात आली. आरोपींनी फायद्याच्या रकमेतून सर्व्हिस चार्ज न कापता, उलट नवीन पैशाची मागणी केल्याने फिर्यादीला संशय आला. त्यांनी विक्रम शहा याला संपर्क केला, मात्र त्यानेही मदत करण्याच्या बहाण्याने फसवणूक करण्याचा प्रयत्न केला. अखेर, आपली मोठी फसवणूक झाल्याची खात्री पटताच फिर्यादीने पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद करून अधिक तपास सुरू केला आहे.

## चाईल्ड हेल्पलाईनने रोखले दोन बालविवाह

धाराशिव । प्रतिनिधी

जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंध मोहिमेंतर्गत चाईल्ड हेल्पलाईन पथकाने दोन बालविवाह रोखण्यास यश मिळविले आहे. उमरगा तालुक्यातील एकुरगा व धाराशिव तालुक्यातील जहागीरदार वाडी येथे हे बालविवाह होणार होते.

एकुरगा येथील १७ वर्षीय व जहागीरदार वाडी येथील १६ वर्षीय अल्पवयीन मुलींचे विवाह होणार असल्याची गोपनीय माहिती चाईल्ड हेल्पलाईनला मिळताच तातडीने दोन्ही ठिकाणी स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली. तपासणीत दोन्ही बालिकांचे वय विवाहासाठी अपुरे असल्याचे स्पष्ट झाले. या मोहिमेत अशोक चव्हाण, अभयसिंह काळे, पल्लवी पाटील, अमर भोसले यांच्यासह ग्रामसेवक दयानंद कोळी (एकुरगा) व ए. बी. माने (जहागीरदार वाडी) तसेच दोन्ही गावांतील ग्राम बाल संरक्षण समित्यांचे सदस्य यांनी सक्रिय सहभाग घेतला. यादरम्यान दोन्ही बालिकांचे व त्यांच्या पालकांचे समुपदेशन करण्यात आले. बालविवाह न करण्याबाबत त्यांच्याकडून हमीपत्र व पंचनामा घेण्यात आला. दोन्ही बालिकांना बालकल्याण समिती, धाराशिव समोर सादर करण्यात आले असून समितीच्या आदेशानुसार जहागीरदार वाडी येथील बालिकेस आपलं घर बालगृह, नळदुर्ग येथे दाखल करण्यात आले. जिल्ह्यात कुठेही बालविवाहाची माहिती मिळाल्यास तातडीने चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा बाल संरक्षण कक्ष यांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार मुलीचे विवाहाचे किमान वय १८ वर्षे आणि मुलाचे २१ वर्षे असणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही विवाह कायदेशीरदृष्ट्या अवैध ठरले. तत्काळ हस्तक्षेप करून हे विवाह थांबविण्यात आले. ही कारवाई महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे व प्रकल्प समन्वयक विकास चव्हाण यांच्या आदेशानुसार करण्यात आली.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
गुरूवार दि. ६ नोव्हेंबर २०२५


## नगरपरिषदांच्या निवडणुकीदरम्यान आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन केले जाईल - जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

काल घोषित झालेल्या निवडणूक कार्यक्रमानंतर बीड जिल्हा प्रशासनाची तयारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , अश्विनी जिरंगे - सोनवणे , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आवाहन

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने कालच राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीचा सार्वत्रिक निवडणुका २०२५ चा कार्यक्रम जाहीर केला असून , या निवडणुका पारदर्शक , शांततामय आणि कायद्याचे काटेकोर पालन करून पार पाडण्यासाठी बीड जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे . निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आदेशानुसार आचारसंहिता लागू झाली असून , निवडणुकीशी संबंधित सर्व प्रक्रिया आता अधिकृतपणे सुरू झाल्या आहेत .

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी , पोलीस विभाग , नगरपरिषद प्रशासन आणि उमेदवारांना कायद्याचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे . त्यांनी सांगितले की , '' स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक म्हणजे लोकशाहीचा पाया आहे . या प्रक्रियेत पारदर्शकता , शिस्त आणि शांतता राखणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे . नागरिकांनी निर्भयपणे मतदान करावे आणि प्रशासनास सहकार्य करावे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी , तहसीलदार आणि नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांसोबत समन्वय बैठक घेतली . त्यांनी सांगितले की , निवडणुकीच्या काळात शिस्तभंग होणार नाही याची खात्री करण्यासाठी सर्व आचारसंहितेचे नियम प्रत्यक्ष अंमलात आणले जातील . आवश्यक असल्यास पोलीस आणि प्रशासनाचे संयुक्त पथक तत्काळ कारवाई करेल .





अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे - सोनवणे यांनी सांगितले की , मतदान केंद्रांवरील सर्व सुविधा नागरिकांच्या सोयीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत . महिलांसाठी स्वतंत्र ओळी , दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ मतदान व्यवस्था यावर विशेष भर दिला जाईल . त्यांनी सांगितले , '' निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव आहे , परंतु त्यात शिस्त आणि सामाजिक जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे

दरम्यान , बीड नगर परिषदेच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी नगरपरिषदेतील उमेदवारांना आवाहन केले की , परवानगीशिवाय कोणतीही सभा , मिरवणूक , मोर्चा किंवा ध्वनिवर्धक वापर करू नये . सर्व कार्यक्रमांसाठी पोलीस विभागाची आणि स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेणे बंधनकारक आहे . निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास कठोर कारवाई केली जाईल . त्यांनी सांगितले , '' लोकशाही मजबूत ठेवायची असेल , तर नियमांचे पालन हे सर्वांनी समानपणे केले पाहिजे . ''

बीड नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी सांगितले की , मतदान केंद्रांवरील स्वच्छता , पिण्याचे पाणी , वीज व्यवस्था , प्रकाशयोजना आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक तयारी सुरू आहे . नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना यासंदर्भात जबाबदाऱ्या वाटप करण्यात आल्या असून , प्रत्येक मतदान केंद्रावर अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहेत. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सविस्तर मार्गदर्शन करताना सांगितले की , '' निवडणूक काळात प्रशासनाची करडी नजर सर्व घडामोडींवर राहील . ध्वनिवर्धक परवानगीशिवाय वापरला जाऊ नये . प्रचारफेरी रात्री १० नंतर करता येणार नाही . '' तसेच त्यांनी उमेदवार आणि कार्यकर्त्यांना शांतता राखण्याचे आवाहन केले . मतदानाचा दिवस म्हणजे उत्सव असला , तरी कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे सर्वांचे कर्तव्य आहे , असे ते म्हणाले. जिल्हा प्रशासनाने जाहीर केलेल्या आदेशानुसार , प्रत्येक प्रचार सभेला पोलीस विभागाची परवानगी आवश्यक असेल . लाऊडस्पीकरसाठी स्वतंत्र परवानगी घ्यावी लागेल . शाळा , शासकीय इमारती , धार्मिक स्थळे येथे प्रचार सभा आयोजित करता येणार नाहीत . उमेदवारांनी निवडणूक पान २ वर



भारतीय जनता पार्टीचे युवा नेते आ.सुरेश धस यांचे सुपुत्र सागर आप्पा धस यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर परिवंत गायकवाड साहेब कऱ्हेवडगाव ग्रामपंचायत ग्रामस्थ आदी



सागर आप्पा धस यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना अजित मुळे , पत्रकार शरद रेडेकर ग्रामपंचायत सदस्य संतोष रणसिंग

## उत्तम हजारे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार

**रविवारी साताऱ्यात वितरण, खा. उदयनराजे भोसले, मंत्री जयकुमार गोरे, मंत्री दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थिती.**

बीड । प्रतिनिधी

बीड येथील पत्रकार उत्तम हजारे यांना महाराष्ट्र भूषण राज्यस्तरीय आदर्श पत्रकार दर्पणरत्न पुरस्कार जाहीर झाला असून, रविवार दि.९ नोव्हेंबर २०२५ रोजी पुरस्काराचे वितरण होणार आहे . खा. उदयनराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती आयोजक दत्तात्रय सयाजी फाळके यांनी दिली.



बीड येथील ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे यांनी पत्रकारितेत केलेल्या पान २ वर

### जनार्धन दिगंबर शिंदे यांचे निधन

चौसाळा । प्रतिनिधी



चौसाळा येथील ज्येष्ठ नागरिक जनार्धन (बापू) दिगंबर शिंदे (वय : ९२) वर्ष यांचे (ता. ०५) गुरुवार रोजी पहाटे पाचच्या दरम्यान निधन झाले. त्यांचा साडेनऊ वाजता चौसाळा येथील ईटाबंदी स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या बचत तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार असून त्यांच्या निधनाने चौसाळा आणि परिसरात सर्वत्र शोककळा पसरली आहे.

## शिरूर तालुक्यात केंद्रीय पथकाचा पाहणी दौरा

**शेतातील नुकसानीसह, शासकीय मालमत्तेची केली पाहणी**

शिरूर । प्रतिनिधी

सप्टेंबर २०२५ या महिन्यात झालेल्या शेतकऱ्यांच्या विविध नुकसानीसह शासकीय मालमत्तेची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथकाने आज शिरूर कासार तालुक्यातील काही भेटी देऊन झालेल्या विविध नुकसानीची पाहणी केली आहे. यामध्ये शेतकऱ्यांची झालेली पीक नुकसान, रस्ते, वाहून गेलेले पूल,तलाव फुटणे, विद्युत वितरणाची पडझड आदी करून पाहणी करण्यात आली आहे.



शिरूर कासार तालुक्यामध्ये १ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत ९३४.९ मिमी. इतक्या पावसाची नोंद झाली असून सरासरीच्या तो १८१ टक्के इतका आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर या दोन महिन्यात एकूण सात वेळेस अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. तथापि या आपत्तीमध्ये सुदैवाने तालुक्यात एकही व्यक्ती मयत झालेली नाही. मात्र मयत झालेल्या पशुधनापैकी १६ प्रकरणांमध्ये पोस्टमार्टम रिपोर्ट प्राप्त झाले होते, त्यानुसार मदतीची कार्यवाही झाली असल्याचे प्रशासकीय अधिकारी सांगत आहेत. असे असले तरी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात त्यांचे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर शासकीय मालमत्तेचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याच अनुषंगाने केंद्रीय पथकाने जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील काही गावांना भेटी दिल्या आहेत. या अंतर्गत शिरूर कासार तालुक्यातील येवलवाडी येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाहून गेलेल्या पुलाची पाहणी केली व शिरूर कासार तालुक्यातील एकंदरीत परिस्थितीचा आढावा घेतला. या केंद्रीय पथकामध्ये सहसचिव आर के पांडे व इस्रोचे वरिष्ठ पान २ वर

## अनिल जगताप यांची कपिलधारवाडीतील भूस्खलनग्रस्तांच्या पुनर्वसनाची मागणी!

**अनिल जगताप यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन**

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील कपिलधारवाडी येथे अलीकडे झालेल्या भूस्खलनामुळे स्थानिक नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून परिसरातील जमिनीत भेगा पडल्यामुळे तेथील घरांना आणि नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर काल दि. ५ नोव्हेंबर २०२५ मुक्तागिरी निवास, मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी निवेदन सादर केले. या निवेदनात कपिलधारवाडी येथील भूस्खलनग्रस्त नागरिकांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाची मागणी करण्यात आली. अनिलदादांनी निवेदनासोबत भूस्खलनग्रस्त ठिकाणांचे प्रत्यक्ष फोटो आणि सविस्तर माहिती सादर करत, प्रभावित नागरिकांना तातडीने सुरक्षित स्थळी हलविणे, पुनर्वसनासाठी ठोस योजना तयार करणे आणि भविष्यात अशा आपत्तींपासून बचावासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याची मागणी केली. पान २ वर



## भाजपचे बंडखोर माजी आ.भीमराव धोंडे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात ११ नोव्हेंबरला होणार प्रवेश!

**५०० प्रमुख कार्यकर्त्यांसह मुंबईतील राष्ट्रवादी भवनात ना. अजितदादांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश**

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी,पाटोदा,शिरूर का.मतदार संघाचे भाग्यविधाते तथा शिक्षण महर्षी,माजी आ. भीमराव धोंडे यांचा प्रमुख ५०० कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार ) पक्ष ११ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रवेश होणार आहे. मुंबईतील राष्ट्रवादी भवनामध्ये हा पक्षप्रवेश सोहळा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार,प्रदेशाध्यक्ष यांच्या आदि मान्यवरांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे. या पक्ष प्रवेश सोहळ्याची बीड जिल्ह्यासह राज्यभर चर्चा सुरू




झाली आहे.या पक्षप्रवेशामुळे राजकारणातील अनेक राजकीय समीकरणे बदलणार आहेत.त्याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे तर भविष्यातील निवडणुकांमध्ये फार मोठा परिणाम या निमित्ताने पाहायला मिळेल असा अंदाज राजकीय



जाणकारांकडुन व्यक्त होत आहे.माजी आ.भीमराव धोंडे हे गेल्या ४० वर्षाहून अधिक काळ सक्रिय राजकीय नेते म्हणून राजकारणात आहेत.राजकारण करताना त्यांनी समाजकारणाला अधिक महत्त्व देऊन विकासाच्या अनेक संकल्पना आष्टी,पाटोदा,शिरूर का.विधानसभा मतदार संघामध्ये राबवल्या.विविध शैक्षणिक संस्था,आरोग्य क्षेत्रातील विविध महाविद्यालय युवकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन,भव्य व्यायाम शाळा, कृषी महाविद्यालय सुरु केले आहे. शेतकऱ्यांसाठी साखर कारखान्यासाठी सध्या संघर्ष उभा केला आहे.एक अभ्यासू, शांत,शिस्तप्रिय आणि विकासाची गंगा मतदार संघात आणण्यासाठी एक निश्चित ध्येय ठेवून चालणारा राजकारणी अशी भीमराव धोंडे यांची ओळख महाराष्ट्राच्या राजकारणात पान २ वर

## एआयएमआयएमच्या नेतृत्वाने बिहारमधील अमौर मतदारसंघात जोरदार प्रचार; बीडचा भाऊ पुन्हा जबाबदारी सांभाळणार

हैदराबाद । प्रतिनिधी

अखिल मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष बॅरिस्टर असदुद्दीन औवेसी साहेब यांच्या आदेशानुसार आणि प्रदेश अध्यक्ष तथा मा. खा. इम्तियाज जलील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाने बिहार विधानसभा निवडणुकीसाठी (२०२५) प्रचारयंत्रणेला वेग दिला आहे. प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर (औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष) आणि मराठवाडा विभागीय अध्यक्ष फेरोज लाला यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील पदाधिकारी बिहारला रवाना झाले असून, अमौर विधानसभा



**बिहार तो झाकी है..!बीड भी अभी बाकी है...!**

मतदारसंघात (पूर्णिया जिल्हा) पक्षाच्या प्रचार मोहिमेला चालना देणार आहेत.

या मोहिमेचा मुख्य केंद्रबिंदू एआयएमआयएमचे बिहार प्रदेश अध्यक्ष तथा अमौरमधील विद्यमान आमदार अख्तरुल ईमान साहेब यांचा पुनर्विचार आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत ईमान यांनी जनता दल (युनायटेड)च्या साबा झफर यांना ५२,५१५ मतांच्या फरकाने पराभूत करून (९४,४५९ मते मिळवून) ही जागा जिंकली होती.त्या निवडणुकीत एआयएमआयएमने सीमांचल पट्टीतील पाच जागा जिंकल्या होत्या, ज्यात अमौरचा समावेश होता. आता २०२५ च्या निवडणुकीतही पक्ष हा मतदारसंघ कायम ठेवण्यासाठी आक्रमक रणनीती आखत आहे, ज्यात जनसुराज पक्षाच्या अफरोज आणि काँग्रेसच्या अब्दुल जलील मस्तान यांच्याशी चार कोपऱ्यांची लढत अपेक्षित आहे.

महाराष्ट्रातून या प्रचारयंत्रणेचा एक प्रमुख चेहरा आहे बीड जिल्ह्यातील 'बीडचा भाऊ' म्हणून ओळखले जाणारे नेते. ते २०२१ मध्ये बिहार विधानसभा निवडणुकीसाठी प्रचारात सहभागी झाले होते आणि पक्षाच्या यशात मोलाची भूमिका बजावली होती. पान २ वर

## बीड पंचायत समितीवर कमळ फुलणार - अशोक रसाळ

**लवकरच निष्ठावंत इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती**

बीड । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे नुकतेच बिगुल वाजले आहे काही दिवसातच जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक तारकाही जाहीर होतील बीड भारतीय जनता पार्टीमध्ये लोकनेत्या ना.मंत्री पंकजाताईसाहेब मुंडे व लोकप्रिय माजी खासदार डॉ.प्रीतमताई साहेबजी मुंडे यांच्या नेतृत्वात भाजप जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली बीड पंचायत समितीवर भगवा फडकण्याचा निर्धार बीड तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी केला आहे



लवकरच बीड तालुक्यात येणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषद गणासाठी इच्छुक निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत,बीड भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागून येणाऱ्या काळात सर्वसामान्यांची कामे जी अनेक वर्षापासून पंचायत समिती ताब्यात नसल्याने होत नाही आहेत ती कामे पूर्ण करण्यासाठी ताकतीने बीड तालुक्याची पंचायत समिती व बीड तालुक्यातील जिल्हा परिषद लढवणार असून विजय खेचून आणणार असल्याचा निर्धार बीड तालुक्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांनी दोन्ही ताईसाहेबांच्या निष्ठावंतांनी व्यक्त केला आहे,दोन्ही ताईसाहेब जो निर्णय घेतील त्यानुसार निवडणुका लढवून त्यात मोठे घवघवीत यश मिळवण्याचा निर्धार बीड भाजप तालुकाध्यक्ष अशोक रसाळ यांनी केला आहे.

## एसटी महामंडळाचे वाहक उत्तम तोटेवाड यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव




बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बीड आगारातील वाहक उत्तम गंगाराम तोटेवाड हे ३३ वर्षे ५ महिन्याच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. उत्तम तोटेवाड यांच्या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त त्यांना महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने भावपूर्ण निरोप देण्यात आला.

यावेळी आगार प्रमुख तिडके एटीएस बनसोडे, आतकरे, आजले, धापसे, रसाळ, महादेव खांडे, रमेश खेडकर, रमेश कानडे, आनंद जगताप प्रशांत क्षीरसागर, भांगे, सुक्रे मॅडम पांचाळ मॅडम सुनील टाक, उपरे, राजाभाऊ वाघ, पत्रकार ज्ञानोबा वायबसे आदींची उपस्थिती होती. यावेळी उत्तम तोटेवाड यांनी प्रामाणिक आणि उल्लेखनीय सेवा बद्दल उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून त्यांचा गौरव केला. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

## दादा म्हणजेच आमचा पक्ष - उत्तमराव पवार

**उपळी जिल्हा परिषद गटात निवडणूक लढविणार - उत्तमराव पवार**

वडवणी । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली आपण दादांच्या सुचनांचे पालन करुन आजवर काम करत आलो आहोत. उपळी जिल्हा परिषद गटात सर्व समाजाच्या सुखदु:खात त्याचबरोबर अडीअडचणीच्या काळात मदतीला धावून जात कोरोना/कोव्हीड या कठीण काळात सुध्दा आम्ही जनतेसाठी काम केले असल्याने या गटातील जनतेची सेवा वृध्दींगत करण्यासाठी आम्हाला जिल्हा परिषदेची निवडणूक लढवावी अशी इच्छा आहे.



आम्ही गटातील जनमानसांच्या भेटीगाठीवर भर दिला आहे. दादा सांगतील तेच आम्ही करणार दादा म्हणजेच आमचा पक्ष आहे.आ.प्रकाश दादा सोळंके यांनी उपळी जि.प.सर्कल मध्ये एकनिष्ठ बंजारा समाजाला प्रतिनिधित्व देणार असल्याचे संकेत आम्हाला मिळाले आहेत. त्यामुळे आम्ही उपळी जिल्हा परिषद गटातुन निवडणूक लढविणार असल्याचे मत उपळी जिल्हा परिषद गटाचे इच्छुक उमेदवार उत्तमराव पवार यांनी व्यक्त केले.

वडवणी तालुक्यातील उपळी जिल्हा परिषद सर्कलमध्ये आ.प्रकाश दादा सोळंके यांनी एकनिष्ठ बंजारा समाजाला उमेदवारी द्यावी अशी मागणी तमाम पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
गुरूवार दि. ६ नोव्हेंबर २०२५ । पान ७

# सांगावा प्रथम वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ट विद्यार्थी शिक्षकांचा प्रतिभावंत अवॉर्ड देऊन गौरव

## माजी पॅरा कमांडो रघुनाथ सावंत यांच्या हस्ते सांगावा न्यूज प्रथम वर्धापन दिनानिमित्त प्रतिभावंत विद्यार्थी आणि शिक्षकांचा सन्मान

**विद्यार्थ्यांनी नोंदविली वर्तमान समाजातील निरीक्षणे**

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

प्रिंट आणि डिजिटल मिडियामध्ये समाजातील घडामोडींचे अचूक वार्तांकन करणाऱ्या साप्ताहिक सांगावा न्यूज च्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ट विद्यार्थी आणि शिक्षकांचा गौरव करण्यात आला. यावेळी समानार्थी विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी तसेच उपस्थित मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. शुभेच्छ्यांची केवळ देवान घेवाण करून सांगावा न्यूज चा वर्धापन दिन साजरा न करता समाजातील काही साधक बाधक गोष्टी जाणून घेवून त्यावर सकारात्मक कार्य करण्याच्या उद्देशाने, बालभारती आणि कुमार भारती वयोगटातील विद्यार्थी विद्यार्थिनींची वर्तमान समाजातील काय निरीक्षणे आहेत हे जाणून घेतले. आपला सन्मान स्वीकारल्या नंतर विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने जे काही चुकीचे निदर्शनास येते त्या गोष्टी सर्वांसमोर व्यक्त केल्या. मंगळावर दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५. वा. असा हा स्तुत्य कार्यक्रम घेऊन, सांगावा प्रथम वर्धापन दिन थेरगाव, काळेवाडी फाटा येथील सांगावा न्यूज कार्यालयात संपन्न झाला. यावेळी विचार मंचावर माजी पॅरा कमांडो रघुनाथ सावंत यांच्यासह थेरगावा येथील पीएमश्री विद्यालयाचे मुख्याध्यक बाबासाहेब राठोड, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष गणेश मोकाशी, संजय गांधी निराधार योजनेचे चिंचवड विधानसभा अध्यक्ष नरेंद्र माने, संभाजी ब्रिगेड शहराध्यक्ष सतीश काळे, सांगावा न्यूज चे संपादक विनय सोनवणे उपस्थित होते. तसेच यावेळी उपस्थित पत्रकार, विद्यार्थी पालक आणि वाचक दर्शकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

आम्ही घरून शाळेत जातांना आणि शाळेतून परत घरी येतांना एक गटार सदृश्य उघडा नाला आहे तिथे पाणीपुरचा ठेला लागतो. तिथे लोकं पाणीपुरी खायला जातात. यावेळी गटार सदृश्य नाल्यातून दुर्गंधी येते ते आरोग्यास हानिकारक आहे. तसेच आमच्या कॉलनीत पाण्यासाठी लावलेली मोटार पाण्याची टाकी भरून वाहत असली तरी मोटार तशीच चालू राहते त्यामुळे पाणी आणि वीज वाया जाते प्राची सचिन कावळे ( इयत्ता९ वी )

कब्बडी खेळत असताना भाजलेल्या मॅट मुळे व्यवस्थित खेळता येत नाही. खेळासाठी महत्वाचे असलेले मॅट व्यवस्थापन भिजणार नाही खराब होणार नाही त्याची काळजी घेतली पाहिजे. आमच्या येथील मॅट व्यवस्थित नसेल तर आम्हाला दुसरीकडे खेळासाठी जावे लागते तेही नंतर घरापासून दूर आहे पल्लवी बाळू गायकवाड ( इयत्ता ८ वी ) थेरगाव फाटा ते तापकीर चौक दरम्यान तसेच नवीन थेरगाव हॉस्पिटल च्या समोरील मुख्य रस्त्यावर ते दिलीप वेंगसरकर स्टेडियन च्या बाजूच्या मुख्य रस्त्यावर लहान आणि मोठ मोठ्या गाड्या पार्किंग केल्या जातात. एवढा मोठा रस्ता असूनही अनधिकृत पार्किंगमुळे छोटा झाला आहे. त्यामुळे नागरिकांना त्याचा व्यवस्थित लाभ घेता येत नाही. शिवाय अपघाताचे प्रमाण वाढत आहे आणि महत्त्वाचे म्हणजे अशी वाहने सतत पार्किंग केल्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांना रस्ते साफसफाई करता येत नाहीत. दुसरा मुद्दा म्हणजे आमच्या इथे रहिवाशी भागात कचरा संकलन डेपो आहे त्यामुळे खूप दुर्गंधी येते. येथील कचरा संकलन हलवून जिथे लोकवस्ती विरळ आहे किंवा लोकं राहत नाहीत अशा ठिकाणी व्यवस्था करावी आमच्या भावना व्यक्त करण्यासाठी विचारपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल आणि सन्मान केल्याबद्दल सांगावा न्यूज टीमचे आभार _परमवीर खंडू आव्हाड ( इयत्ता ९ वी )







विद्यार्थी विद्यार्थिनींची समाजातील निरीक्षणे जाणवून घेऊन त्यासंदर्भात सांगावा न्यूज च्या तिन्ही प्लॅटफॉर्मवर बातमीच्या माध्यमातून पाठपुरावा करून शासन आणि प्रशासन दरबारी मांडण्याचा प्रयत्न करू असे सांगावा न्यूज चे संपादक विनय सोनवणे यांनी सांगितले. तर माजी पॅरा कमांडो रघुनाथ सावंत यांच्यासह थेरगावा येथील पीएमश्री विद्यालयाचे मुख्याध्यक बाबासाहेब राठोड, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष गणेश मोकाशी, संजय गांधी निराधार योजनेचे चिंचवड विधानसभा अध्यक्ष नरेंद्र माने, संभाजी ब्रिगेड शहराध्यक्ष सतीश काळे, क्रीडा व सहाय्यक शिक्षिका सोनाली जाधव मॅडम यांनी सांगावा न्यूज च्या वर्षभरात प्रकाशित झालेल्या समाजहिताच्या बातम्यांबद्दल टीम सांगावा चे कौतुक केले तर सातत्याने दाखवत असलेल्या शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील बातमीदारीबद्दल प्रोत्साहनपर मनोगते व्यक्त करून साप्ताहिक सांगावा न्यूज च्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी विद्यार्थी शिक्षक पालकांसह विविध क्षेत्रातील मान्यवर यामध्ये सामाजिक कार्यकर्ते प्रमोद शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार ) चे शहर उपाध्यक्ष अमोल उबाळे, सामाजिक कार्यकर्ते जाफर शेख, पत्रकार आणि डिजिटल मिडिया शहर उपाध्यक्ष संतोष गोतावळे, सचिव सागर सूर्यवंशी, माजी अध्यक्ष महावीर जाधव, नगरसदस्य ( हातगाडी पथारी टपरी व्यावसायिक पंचायत), जिल्हा संघटक चिराग फुलसुंदर, अजय लोंढे, श्रीहरी सोनकांबळे, पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले , रमेश साठे, हरिश्चंद्र देहुगावकर, अशोक कोकणे, शिंगोटे सर, इत्यादी पत्रकार तसेच सिने अभिनेते प्रमोद साखरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते ऊऋ च्या दृष्टी जैन, तसेच टीम सांगावा चे संभाजी बारबोले, अमर चाकोटतकर, राहुल जाधव, लिटिल सायन्स चे दत्तात्रय गिरमकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दरम्यान सांगावा न्यूज च्या वर्धापन दिन विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी ऊखऋद्ध फाउंडेशन चे नरेश गोल्ला सर आणि टीम ऊऋ चे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुलुखमैदान प्राध्यापक तुषार डुकरे पाटील यांनी केले तर सांगावा न्यूज चे संपादक विनय सोनवणे यांनी आभार व्यक्त केले.

# दुचाकी अपघातात शिळिंब गावातील इसमाचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

भोर-महाड मार्गावर बुधवार (दि.५) सकाळी वरंधा घाटातील माझेरी (ता.महाड) हद्दीतील एका धोकादायक वळणावर दुचाकी घसरून झालेल्या अपघातात भोर तालुक्यातील शिळिंब गावातील इसमाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शिळिंब (ता.भोर) येथील शिवाजी दाजी डेरे (वय ५०) हे बुधवारी सकाळच्या सुमारास महाडकडून आपल्या गावी भात कापणीसाठी दुचाकीवरून येत होते. मात्र वरंधा घाटातील माझेरी गावाच्या हद्दीतील वळणावर




त्यांच्या दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि ते थेट दरीकडील रस्त्याच्या पट्टीवर पडले. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, संबंधित वळणावर सुरक्षा दृष्टीने बॅरिगेट वा दिशादर्शक फलक नसल्याने हा अपघात घडल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. त्यांनी प्रशासनाकडे या धोकादायक वळणावर तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. अपघाताची माहिती मिळताच महाड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. शिवाजी डेरे यांच्या आकस्मिक निधनाने हिरडस मावळ व शिळिंब परिसरात शोककळा पसरली आहे.


# फाकटे गावात कालवडीवर बिबट्याचा हल्ला; ग्रामस्थ भयभीत

**जांबुत । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील बेट भागात बिबट्याचा हौदोस सतत सुरूच आहे. पिंपरखेड आणि जांबुत परिसरात नुकतेच घडलेल्या हल्ल्यांच्या घटना ताज्या असतानाच, आता फाकटे (ता. शिरूर) येथेही बिबट्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे.

स्थानिक शेतकरी महेश देवराम टेके यांच्या कालवडीवर बिबट्याने झडप घालण्याचा प्रयत्न केला असून, त्या हल्ल्यात कालवड जखमी झाली आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं असून सामाजिक कार्यकर्ते शंकर उर्फ नितीन पिंगळे यांनी पिंजऱ्यांची संख्या वाढविण्याची मागणी वनविभागाकडे केली आहे.

घटनेनंतर वनविभागाने तातडीने तीन पिंजरे लावले असून, या भागात दहा ते पंधरा बिबटे फिरत असल्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. हल्ले करणाऱ्या बिबट्यांना तातडीने



जेरबंद करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. अगदी आठ दिवसांपूर्वी याच गावातील सारिका लक्ष्मण राऊत या महिला सकाळी साडेसहा वाजता हिटर चालू करण्यासाठी बाहेर गेल्या असता, सोलर पंपाच्या प्लेटखाली दबा धरून बसलेल्या बिबट्याला त्यांनी पाहिले. आरडाओरड करत त्यांनी घराकडे पळ काढल्याने त्या थोडक्यात बचावल्या. गेल्या काही दिवसांत बिबट्यांच्या वाढत्या हालचालींमुळे शेतकरी आणि महिला वर्गात भीतीचे सावट पसरले आहे. नागरिकांनी वनविभागाला इशारा दिला आहे की, घटना घडल्यावर नव्हे, तर आधीच ठोस उपाययोजना करा, अन्यथा मोठा अनर्थ ओढवू शकतो.

# स्वच्छ पुण्यासाठी आयुक्त मैदानात; ऑन ग्राउंड कर्मचाऱ्यांशी साधला संवाद

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात रात्रीच्या वेळी शहर स्वच्छता करण्यावर भर दिला जात आहे. अशा वेळी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून रात्रपाळीतील सुरक्षा यंत्रणा मजबूत केली जाईल असे आश्वासन महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी महापालिकेच्या ऑन ग्राऊंड स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिले.

'स्वच्छतेचा पुणे पॅटर्न' ही विशेष मोहीम महापालिका आयुक्तांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आली असून त्या अंतर्गत आयुक्त राम यांनी परिमंडळ क्र. ५ अंतर्गत आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहरातील स्वच्छतेची सद्यस्थिती, घनकचरा व्यवस्थापनातील अडचणी, ऑन ग्राउंड कर्मचाऱ्यांना येणाऱ्या समस्यांचा आणि उपाययोजनांचा सखोल आढावा घेण्यात आला.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम, परिमंडळ ५ चे उपायुक्त सुनिल



बल्लाळ, क्षेत्रीय कार्यालयांचे सहाय्यक आयुक्त, आरोग्य निरीक्षक, वरिष्ठ निरीक्षक आणि मोकादम यावेळी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मोकादमांनी प्रत्यक्ष कामकाजातील अडचणींची माहिती आयुक्तांना दिली. काही नागरिकांकडून असहकार्य, कचरा नियमानुसार न देणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकणे, तसेच झोपडपट्टी आणि अरुंद रस्त्यांमुळे कचरा संकलनात येणाऱ्या अडचणींचा उल्लेख त्यांनी केला.


याशिवाय कचरा वाहतूक वाहनांची संख्या अपुरी असणे, पर्यायी गाड्या वेळेत न मिळणे, मनुष्यबळाचा तुटवडा आणि वयस्कर स्वच्छता कर्मचाऱ्यांमुळे कामाचा वेग कमी होणे या समस्याही मांडण्यात आल्या. अतिक्रमण आणि हातगाडी विक्रेत्यांकडून परिसरात अस्वच्छता वाढत असल्याचेही लक्षात आणून दिले. रात्रपाळीत काही ठिकाणी दमदाटी व असुरक्षित परिस्थितीचा सामना करावा लागतो, अशी तक्रारही कर्मचाऱ्यांनी केली.

# झोक्यावर खेळत बसलेला चिमुकला थोडक्यात बचावला ! मांजरीमागे आलेल्या बिबट्याचा थरार

**शिरूर । प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यात पुणे (झींपश) जिल्ह्यातील काही तालुक्यात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात लहान मुलांचा जीव गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. त्यामुळे, ग्रामस्थांकडून वन विभागावर संताप व्यक्त होत आहे. त्यातच, काळेचीवाडी येथील एका घरातील लहान मुलगा झोक्यावर बसून आनंद घेत होता, तितक्यात मांजरीचा पाठलाग करत बिबट्या थेट घरात शिरल्याचं पाहायला मिळालं. बिबट्याला (श्रशेरीव) पाहताच चिमुकल्याने घरात जाऊन आई-वडिलांना माहिती दिली, तेवढ्यात बिबट्या पळून गेला. हा सर्व थरार व्हिडिओत कैद झाला आहे.

शिरुर तालुक्यातील पिंपरखेड येथे काही दिवसांपूर्वी बिबट्याच्या हल्ल्यात पाच वर्षांच्या शिवन्या बोंबेचा मृत्यू झाला होता. २२ ऑक्टोबर रोजी भागाबाई रंगनाथ जाधव (वय ७०, मौजे जांबुत, ता. शिरूर) या वृद्ध महिलेचा याच बिबट्याच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यानंतर शनिवारी (दि. १) रोहन विलास बोंबे या १४ वर्षीय मुलावर बिबट्याने हल्ला करत त्याला



ठार केले होते. मनुष्यवस्तीत सातत्याने नागरिकांवर होणाऱ्या बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर जीव घेणाऱ्या बिबट्याला जेरबंद करण्यात यावे, अशी मागणी सातत्याने केली जात होती. मात्र, त्याला यश येत नव्हते. त्यामुळे आक्रमक झालेल्या नागरिकांनी आंदोलन करत जाळपोळदेखील केली. अखेर त्या बिबट्याला ठार करण्यात वन विभागाला यश आलं आहे. मात्र, एकीकडे नरभक्षक बिबट्याला ठार करण्यात आलं असलं तरी अद्यापही गावात येणाऱ्या बिबट्यांचं प्रमाण काही केल्या कमी झाल्याचं दिसत नाही. शिरुर तालुक्यातील पिंपरखेड गावात नुकताच १४ वर्षीय रोहन बोंबे या चिमुकल्याचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला होती, आणि ही घटना ताजी असतानाच खेड तालुक्यातील काळेचीवाडी येथे आणखी एक धक्कादायक प्रकार घडला आहे. घराच्या अंगणात झोक्यावर खेळणारा एक चिमुकला बिबट्याच्या हल्ल्यातून थोडक्यात बचावला असून, हा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. खेड तालुक्यातील काळेचीवाडी येथे घराच्या अंगणात चिमुकला झोक्यावर खेळत असताना बिबट्या अचानक कुत्र्याची शिकार करण्यासाठी थेट कंपाऊंडमध्ये घुसला. काही क्षणातच चिमुकल्याने प्रसंगावधान राखत घरात धाव घेतली. कुटुंबीयांनी आरडाओरड केल्याने बिबट्या घाबरून पळून गेला. बिबट्याच्या या थरारक हालचाली सीसीटीव्हीमध्ये स्पष्टपणे कैद झाल्या आहेत. या घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं असून, स्थानिकांनी वनविभागाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# 'भाजप'कडून जिल्ह्याची जबाबदारी मुरलीधर मोहोळांकडे तर पुण्यात गणेश बिडकर निवडणूक प्रमुख

**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाने आगामी महापालिका निवडणुकीसाठी पुण्याचे खासदार व केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची निवडणूक प्रभारी (जिल्हा प्रमुख) म्हणून तर माजी सभागृह नेते गणेश बीडकर यांच्यावर पुणे महापालिका निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी सोपवली आहे.

मोहोळ यांनी पूर्वी स्थायी समिति अध्यक्ष, महापौर म्हणून कार्यभार सांभाळला आहे तर बीडकर यांनी यापूर्वी नगरसेवक, गटनेता, स्थायी समिति अध्यक्ष तसेच सभागृह नेते म्हणून विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांनी बुधवारी याबाबतची घोषणा केली. त्यानुसार जिल्हा निवडणूक प्रभारी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या नेतृत्वात बीडकर यांच्याकडे पुणे शहराच्या निवडणूक प्रमुखपदाची



जबाबदारी देण्यात आली आहे.

'केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात एनडीएचे तर राज्यात देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार सत्तेवर आहे. विकासाभिमुख धोरणांची आखणी आणि त्याची वेगवान अंमलबजावणी हे केंद्र आणि राज्य सरकारचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदार नक्कीच भारतीय जनता पक्ष आणि महायुतीवर विश्वास दाखवतील. पुणे महानगरपालिका, पुणे जिल्हा आणि पिंपरी चिंचवडमध्ये भाजप, महायुतीच सत्तेवर येईल,असे मोहोळ म्हणाले. पक्षनेतृत्वाने ही संधी दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे, असेही मोहोळ यांनी नमूद केले.

राज्यात भाजप व महायुतीला अनुकूल वातावरण आहे. पुणे महापालिकेत २०१७-२२ या काळात भारतीय जनता पक्षाचीच सत्ता होती. या पाच वर्षात पुणे शहराच्या भाजपने मोठ्या प्रमाणात विकासकामे केली. यंदाही पुणेकर भाजप व महायुतीच्याच पाठीशी राहतील, याची मला खात्री आहे. शहर निवडणूक प्रमुखपदी नियुक्ती केल्याबद्दल मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा आभारी आहे. २०१७ च्या निवडणुकीतही निवडणूक प्रमुखपदाची जबाबदारी माझ्याकडे होती. त्या वेळेप्रमाणेच यंदाही भाजप, महायुती सत्तेवर येईल,' असा विश्वास बीडकर यांनी व्यक्त केला.

# निकालापेक्षा सर्वोत्तम खेळावर भर द्या.! -मंत्री मुरलीधर मोहोळ

**पुणे । प्रतिनिधी**

स्पर्धा म्हटली की विजय-पराभव आलाच. मात्र, त्याचा विचार न करता सर्वोत्तम खेळावर भर द्या, असे प्रतिपादन केंद्रिय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी केले. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतील 'फिट इंडिया' संकल्पनेअंतर्गत पुण्यात सुरू असलेल्या 'सांसद खेल महोत्सव' अर्थात खासदार क्रीडा महोत्सवातील टेबल टेनिस स्पर्धेचे उद्घाटन डेक्कन जिमखाना येथे झाले.

या वेळी बोलताना मोहोळ म्हणाले, मीही एकेकाळी खेळाडू होतो. खेळाडूंना काय आवश्यक असते, याची मला पूर्ण जाण आहे. मात्र, खेळाडूंनी आपल्या सर्वोत्तम खेळाकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. सर्वोत्तम खेळ केला, तर यश आपोआप मिळते. पराभवातून शिकून पुढे जायला हवे. आपले काय चुकले, त्याचा विचार करून पुढे ती चूक पुन्हा होणार नाही, यावर मेहनत घेतली पाहिजे. खेळ



कुठलाही असो, मेहनतीशिवाय पर्याय नाही.

या उद्घाटनप्रसंगी विविध वयोगटांतील युवक-युवतींचा उत्स्फूर्त सहभाग पाहून मोहोळ भारावले. त्यांनी खेळाडूंशी व्यक्तिगत संवाद साधून स्पर्धकांचे मनोबल वाढवले, तसेच अनेक खेळाडूंशी संवाद साधून त्यांच्या अपेक्षा, अडचणी आणि प्रशिक्षणाविषयीच्या गरजा जाणून घेतल्या. त्याचबरोबर अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासनही दिले. या संपूर्ण स्पर्धेदरम्यान दिसत असलेली तरुणाईची ऊर्जा, शिस्त आणि स्पर्धात्मक भावना ही निश्चितच समाधानाची बाब असल्याचे मोहोळ म्हणाले. या उद्घाटन प्रसंगी पुणे पोलीस उपायुक्त संदीप भाजीभाकरे साहेब, शिवछत्रपती पुरस्कार विजेते सुनील बाबरस, मॉर्डन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे, प्रकाश तुळपुळे, खासदार क्रीडा चषकाचे समन्वयक मनोज एरंडे, शैलेश टिळक, राजीव बोडस, प्रकाश तुळपुळे, श्रीराम कोणेकर, स्मिता बोडस, अजय शिंदे, मोहन उसगावकर, श्रीकांत अंतुरकर, राष्ट्रीय खेळाडू सन्मय परांजपे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते रोहित चौधरी, सुजाता बाबरस, अश्लेषा बोडस, सोनिया देशपांडे, रवींद्र साळेगावकर, सुनील पांडे, शैलेश बडदे, संयोजक किरण ओरसे, सौरभ कुंडलिक, सागर परदेशी, अर्चना सोनवणे, ईश्वर बनपट्टे, अपूर्व सोनटक्के, लताताई धायगुडे, अपर्णा कुऱ्हाडे, अजय दुधाने, हेमंत डाबी, सुजित गोटेकर, प्राजक्ता डांगे, प्रीती शहा, सचिन मानवतकर आदी मान्यवर उपस्थित होते.

ही स्पर्धा १६ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिक, मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात येणार आहे. या महोत्सवात एकूण ३५ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. पुणेकरांना विविध खेळाचा थरार अनुभवण्याची संधी या महोत्सवानिमित्ताने मिळत आहे. विविध वयोगटात शालेय विद्यार्थी, महाविद्यालयातील तरुण, अनुभवी खेळाडू आणि प्रौढ खेळाडूही या स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवित आहेत.

# शिरूर येथे जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन होणार:विधि व न्याय विभागाची मंजुरी

**पुणे । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील घोडनदी येथे न्यायव्यवस्थेचा नवा टप्पा गाठला जाणार आहे. राज्य सरकारच्या विधि व न्याय विभागाने येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) आणि शासकीय अभियोक्ता कार्यालय स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे.

या निर्णयामुळे शिरूर तालुक्यासह पूर्व पुणे परिसरातील नागरिकांना न्यायालयीन कामकाजासाठी पुणे शहरात जाणे वाचणार आहे. स्थानिक पातळीवर न्यायसेवा उपलब्ध झाल्याने न्यायप्रविष्टांना वेळ, पैसा आणि श्रम या तिन्ही बाबतीत मोठा दिलासा मिळणार आहे, अशी प्रतिक्रिया न्यायवर्तुळातून व्यक्त होत आहे. नवीन न्यायालय सुरू करण्यासाठी आवश्यक न्यायाधीश, लिपिक, कारकून, शिपाई, अभियोक्ता व अन्य सहाय्यक पदांची निर्मिती करण्यासही शासनाने मान्यता दिली आहे.

तसेच, इमारत बांधकाम, कार्यालयीन साहित्य आणि




सुरक्षाव्यवस्था यासाठी स्वतंत्र निधी मंजूर करण्याची प्रक्रिया लवकरच हाती घेतली जाणार आहे. घोडनदी परिसर शिरूर तालुक्याच्या मध्यभागी असल्याने न्यायालयासाठी सोयीस्कर ठरेल, असे प्रशासनाचे मत आहे. या निर्णयामुळे शिरूर, पारगाव, तळेगाव ढमढेरे, कोळगाव, केडगाव, मोरगाव, निरगुडी परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.

शिरूर बार असोसिएशनच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश आले आहे. असोसिएशनचे अध्यक्ष ड. उदय सरोदे यांच्या नेतृत्वाखाली घोडनदी (शिरूर) येथे जिल्हा व सत्र न्यायालय, दिवाणी न्यायालय आणि शासकीय अभियोक्ता कार्यालय स्थापन करण्याची मागणी केली जात होती. यासाठी अनेक निवेदने, बैठका आणि शासनस्तरीय पाठपुराव्यानंतर अखेर विधि व न्याय विभागाने या मागणीस मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे शिरूर तालुक्यातील वकिलांना व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, स्थानिक न्यायव्यवस्थेचा दर्जा उंचावणार आहे. बार असोसिएशनतर्फे सर्व सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.